सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. १२ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक ११ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विवोने वी५०ई लाँच केला

पुणे- जागतिक स्तरावरील नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड विवोने आज त्यांच्या स्टायलिश व्ही मालिकेतील नवीनतम उत्पादन वी५०ई लाँच केले. उत्कृष्ट डिझाइनसह अत्याधुनिक पोर्ट्रेट वैशिष्ट्यांचे संयोजन करून, वी५०ई सोनी मल्टीफोकल प्रो पोर्ट्रेट कॅमेरा सिस्टम आणि ५०एमपी आय-एएफ ग्रुप सेल्फी कॅमेरासह एक उत्कृष्ट स्मार्टफोन अनुभव प्रदान करते. एक इमर्सिव्ह अनंत पाहण्याचा अनुभव देणारा, हा स्मार्टफोन अल्ट्रा-स्लिम क्वाड-कर्व्हड डिस्प्ले आणि फक्त ०.७३९ सेमी१ आकाराची स्लीक बॉडीसह येतो. स्थानिक ग्राहकांच्या गरजा आणि आवडी निवडी पूर्ण करण्याच्या विवोच्या सततच्या प्रयत्नांना अनुसरून, विवोने व्ही५०ई हा स्मार्टफोन दोन आकर्षक रंगांमध्ये सादर केला आहे - सॅफायर ब्लू आणि पर्ल व्हाइट, जे लक्झरी आणि स्टाइलचा अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेले आहेत. विवो वी५०ई ची किंमत ८जीबी + १२८जीबीव्हेरिएंटसाठी २८,९९९ रुपये (करांसह) आणि ८जीबी + २५६जीबी व्हेरिएंटसाठी ३०,९९९ रुपये (करांसह) असेल. त्याची विक्री १७ एप्रिलपासून विवोच्या अधिकृत वेबसाइट, फ्लिपकार्ट, अमेझॉन आणि सर्व पार्टनर रिटेल स्टोअर्सवर सुरू होईल.

## आईकू ने भारतात ज़ेड 10 मालिका लाँच केली

पुणे : उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड असलेल्या आईकू ने भारतात त्यांच्या नवीनतम ज़ेड १० मालिका - आईकू ज़ेड१० आणि आईकू ज़ेड१०एक्स - लाँच करून पुन्हा एकदा उद्योगात नवीन बेंचमार्क स्थापित केले आहेत. अत्याधुनिक कामगिरी आणि अभूतपूर्व नवोपक्रमाने परिपूर्ण, ही मालिका विशेषतः शक्तिशाली कनेक्टिव्हिटी, तल्लीन मनोरंजन आणि विश्वासार्ह संपूर्ण दिवस कामगिरी शोधणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केली आहे. आईकू ज़ेड१० मालिका वापरकर्त्यांना मेगाटास्किंगची शक्ती देते, ज्यामुळे ते त्यांच्या गतिमान जीवनशैलीचे सहज व्यवस्थापन करू शकतात आणि दिवसभर कनेक्टेड राहू शकतात.

## अंबुजा सिमेंट्सने कंत्राटदाराला केले सक्षम

अहमदनगर- अंबुजा सिमेंट्सतर्फे नेवासा तालुका, अहमदनगर येथील श्री. जालिंदर जगताप यांना गवंडीकामापासून प्रगती करत यशस्वी कंत्राटदार होण्यास मदत केली आहे. २००० मध्ये करियर सुरू केलेल्या श्री. जगताप यांनी २००७ मध्ये कंत्राटकाम सुरू केले. आरसीसी सेंटरिंग, गवंडीकाम आणि प्लास्टिंगचे काम घ्यायला त्यांनी सुरुवात केली. आज ते १४ ठिकाणच्या सक्रिय साइट्स हाताळत असून त्यापैकी पाच ठिकाणी केवळ अंबुजा प्लस आणि कवच सिमेंट वापरले जाते. १० गवंडी आणि ९० कामगार आणि चार सुपरवायजर्सच्या मदतीने ते स्वबळावर सेंटरिंगचे साहित्य, काँक्रीट मिक्सर्स आणि काँक्रीट पंपचे कामकाज हाताळत आहे. दर्जा आणि नाविन्याप्रती असलेल्या बांधिलकीने त्यांना या परिसरात नाव मिळवून दिले आहे. अंबुजा अभिमान लॉयल्टी प्रोग्रॅमचे प्रतिष्ठित सदस्य या नात्याने श्री. जगताप सक्रियपणे अंबुजाच्या मूल्यवर्धित सेवांमध्ये सहभागी होऊन दर्जेदार बांधकामाचे निकष जपतात. सर्वोत्तम पद्धती आणि ग्राहक समाधानावर भर देत त्यांनी विश्वास व विविध ग्राहक मिळवले आहेत.

## आयोडिनयुक्त मीठ : तुमच्या आरोग्यासाठी लाभदायक

आयोडिनयुक्त मीठ हा काही फक्त सरकारने निर्धारित केलेल्या आयोडिनच्या मात्रेची पूर्तता करण्यासाठी बनवलेला एखादा घटक-पदार्थ नाही, तर हे मीठ त्याहूनही अधिक मोलाचे आहे. मिठाने अन्नाला हवी तशी चव आणता येते, तसेच आयोडिनयुक्त मिठाचे सेवन केल्याने अनेक आरोग्यदायी लाभ होतात. मीठ हा स्वयंपाकात सर्वाधिक वापरला जाणारा घटक असल्याने, युनिव्हर्सल सॉल्ट आयोडायजेशन (यूएसआय) शिफारशीनुसार मिठात आयोडिन मिसळले जाते. त्यामुळे आयोडिनची कमतरता भरून निघते व या कमतरतेमुळे होऊ शकणारे विकार (आयडीडी) टाळण्यास मदत होते. गेल्या अनेक दशकांपासून जगभरातील सार्वजनिक आरोग्य उपक्रमांमध्ये याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे. भारतानेही मोठ्या प्रमाणावर आयडीडीवर नियंत्रण मिळवले आहे. 'भारत आयोडिन सर्वेक्षण २०१८-१९'नुसार, सुमारे ७६.३ टक्के कुटुंबे किमान १५ भाग प्रति दशलक्ष (पीपीएम) आयोडिन असलेले मीठ योग्य प्रमाणात वापरतात. मात्र, या सर्वेक्षणात असेही आढळले की फक्त २२.४ टक्के लोकांना आयोडिनयुक्त मीठ सेवनाचे फायदे माहीत आहेत. आयोडिनच्या योग्य पोषणामुळे गळू (गोईटर) होण्यापासून बचाव करता येतो, याची माहिती केवळ ६१.४ टक्के लोकांना आहे.

## अन्ननलिकेवर शस्त्रक्रिया करुन वाढवली अन्नप्राशनाची क्षमता

एप्रिल २०२५- भारतीय वंशाच्या १८ वर्षीय मॉरिशसचा नागरिक असलेल्या मुलाच्या अन्ननलिके ला मोठी इजा झाली होती, त्यानी अपघाताने अल्कालाईन अशा द्रवाचे प्राशन केले होते, ज्यामुळे त्याची अन्ननलिका अकुंचन पावली होती. यामुळे तो द्रवपदार्थ सुध्दा पिऊ शकत नव्हता, ज्यामुळे त्याचे कुपोषण वाढले आणि वजन खूप वेगाने घटू लागले होते. त्यानंतर त्याच्यावर बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल मध्ये मिनिमनली इन्व्हेझिव्ह शस्त्रक्रिया करण्यात आली, ज्यामुळे आता तो खाऊ शकत आहे आणि पोषक घटक त्याला मिळू लागले आहेत.सुरुवातीला डॉक्टरांननी लेप्रोस्कोपिक जेंजुनोस्टॉमी केली, या शस्त्रक्रियेमध्ये अन्ननलिकेतून एक नळी थेट छोट्या आतड्यापर्यंत नेण्यात आली. या प्रक्रियेमुळे रुग्णाला आता पोषक घटक द्रवपदार्थाच्या स्वरुपात दिले जाऊ लागेल, ज्यामुळे दोन आठवड्यात त्याचे पोषण वाढले. त्याची प्रकृती स्थीर झाल्यानंतर त्याच्यावर गॅस्ट्रिक पुल अप सह थोराको-लेप्रोस्कोपिक इस्फागेक्टॉमी करण्यात आली .

## रिअलमी तर्फे नार्झो ८० प्रो आणि ८० एक्स ५जी लाँच

छत्रपती संभाजीनगर, ९ एप्रिल २०२५ : भारतीय तरुणांमधील सर्वात लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमीने आज रियलमी नार्झो ८० प्रो ५ जी आणि रियलमी नार्झो ८० एक्स ५जी लाँच केले. हे डिव्हाइस रिअलमीच्या सिग्नेचर व्हॅल्यू प्रपोजलसह अभूतपूर्व इनोव्हेशन्सची सांगड घालतात, ज्यात फ्लॅगशिप-ग्रेड वैशिष्ट्ये उपलब्ध किंमतीत दिली जातात. रिअलमी नार्झो ८० प्रो ५ जी आणि रिअलमी नार्झो ८०एक्स ५ जी उद्योगातील पहिले विशेषतांसह ध्रुवांक वाढवतात, जसे की आयपी ६९ वॉटरप्रूफिंग, मिलिटरी-ग्रेड शॉक रेझिस्टन्स आणि ॲडव्हान्स्ड कुलिंग सिस्टीम. रिअलमीच्या 'मेक इट रिअल' तत्त्वज्ञानाशी एकनिष्ठ राहून, हे स्मार्टफोन प्रीमियम डिझाइन, बेजोड टिकाऊपणा आणि नेक्स्ट जेन कार्यक्षमता यांचे समाकलन करतात, ज्यामुळे ज्यांनी सर्वोच्च वैशिष्ट्ये हवी असतात, त्यांच्यासाठी हा एकमेव पर्याय ठरतो.

## शिवसेना भवन सोयगांव येथे क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती उत्साहात



तभा.वृत्तसेवा
सोयगांव,दि.११ एप्रिल

सोयगांव येथील आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालयात थोर समाजसेवक महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी करण्यात आली.यावेळी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख संतोष बोडखे,हर्षल काळे, राजू दुतोंडे,गजानन कुडके,लतिफ शहा,सलीमखा पठाण, कदीर शाह,शेख बबलू,जिवन पाटील,सामाजिक कार्यकर्ते श्रावण राठोड,रमेश चव्हाण,जाकेर देशमुख,संभाजी पवार आदींची उपस्थिती होती.

# खा. डॉ कल्याण काळे यांची आढावा बैठकीत सूचना



तभा वृत्तसेवा

पैठण दि ११ :- जालना लोकसभा मतदारसंघातील पैठणला खासदार डॉ कल्याण काळे यांच्या उपस्थितीत पंचायत समिती तसेच तहसील कार्यालय याठिकाणी प्रशासनाची आढावा बैठक घेण्यात आली ज्यात दिशा समितीच्या माध्यमातून केंद्र सरकार राबवत असलेल्या योजना नागरिकांपर्यत पोहोचतात की नाही याची माहिती घेऊन खासदार काळे यांनी तहसीलदार दिनेश झंपले,मुख्याधिकारी पल्लवी अंभोरे, पंचायत समिती गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड यांना कामाबद्दल सूचना दिल्या.

यावेळी माजी आमदार वाघचौरे, दत्ता गोर्डे, रवींद्र पाटील काळे, तालुकाध्यक्ष विनोद तांबे, तालुकाध्यक्ष डॉ गुलदाद पठाण,शहराध्यक्ष निमेश पटेल,शुभम पिवळ, अजय परळकर, आप्पासाहेब गायकवाड,दिलीप सवणे, अँड किशोर वैद्य सह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच उ.बा. ठा चे पदाधिकारी उपस्थित होते. गावोगावी सुरू असलेली कामे,अतिवृष्टी अनुदान, अवैध वाळू उपासा, नळाला पाणी, स्वच्छता, नाथषष्ठी व्यवस्थे बद्दल नाराजी आदी विषयी या आढावा बैठकीत चर्चा करण्यात आली.

# प्रसिद्ध कवी फकीरराव शिंदे यांच्या हस्ते अनंत शांततेचे प्रतिध्वनी या डॉ.पवार लिखित पुस्तकाचे प्रकाशन

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.११ एप्रिल

प्रसिद्ध कवी फकीरराव शिंदे यांच्या शुभहस्ते नामवंत साहित्यिक व अभ्यासक डॉ.प्रमोद अंबादासराव पवार लिखित अनंत शांततेचे प्रतिध्वनी या नव्या ग्रंथाचे प्रकाशन उत्साहात पार पडले.दिवाघर प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेल्या या ग्रंथात लघुकथा,लघु-उपन्यास,आणि सीता ही धाडसी परा-संरचनात्मक एकांकिका यांचा समावेश आहे. जी पौराणिक कथांना आधुनिक स्त्री-अधिकार व समानतेच्या दृष्टिकोनातून नव्याने मांडते.

डॉ.पवार हे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील इंग्रजी विभागप्रमुख व आंतर-गुणवत्ता हमी कक्ष संचालक आहेत.ते पेंग्विन प्रकाशने चे संपादक तसेच एपिटोम व सीगल या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांचे मुख्य संपादक म्हणून कार्यरत आहेत.



या प्रकाशन सोहळ्यात अजिंठा शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष रंगनाथ काळे व सचिव प्रकाश काळे यांनी डॉ.पवार यांच्या साहित्यिक कार्याचे विशेष कौतुक केले.प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

पुस्तकाची संकल्पना (ढहशाश):

अनंत शांततेचे प्रतिध्वनी या ग्रंथात स्थितप्रज्ञता (ीशीळश्रळशपलश),स्त्री-स्वातंत्र्य,मानवी संघर्ष,आणि पौराणिकता व आधुनिक वास्तवातील तात्त्विक संबंध यांसारख्या गंभीर व संवेदनशील विषयांची सखोल मांडणी केली आहे.सीता या एकांकिकेतून स्त्रियांचे प्रजननाधिकार, लिंगसमानता,आणि त्यांची अंतर्निहित शक्ती यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.या संग्रहातील कंपनांखाली सारख्या कथा मानवी जीवन आणि निसर्ग यांच्यातील भावनिक आणि अस्तित्वाशी संबंधित नातेसंबंध उलगडतात,जे संकटाच्या क्षणी मानवी सहनशक्तीचे अनंत प्रतिध्वनी व्यक्त करतात.

या प्रकाशन सोहळ्याने सृजनशील अभिव्यक्ती व तात्त्विक विचार यांचे साहित्यिक क्षेत्रातील स्थान अधोरेखित केले. अनंत शांततेचे प्रतिध्वनी हे डॉ.पवार यांच्या साहित्यिक प्रवासातील आणखी एक महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर पावतीमुक्त जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुमित मगरे

तभा वृत्तसेवा

पैठण दि ११ : पैठण शहरातील महात्मा जोतिराव फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पावतीमुक्त जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी सुमीत मगरे यांची तर सचिव म्हणून चैतन्य बनकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

जयंती उत्सव समितीची बैठक पैठण शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे आयोजित करण्यात आली होती. सर्वांच्या उपस्थितीमध्ये महात्मा जोतीराव फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी



सुमीत मगरे यांची निवड करण्यात आली तर सचिव पदी चैतन्य बनकर यांची निवड करण्यात आली आहे. पैठण शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती गेली आठ वर्षापासून पावतीमुक्त स्वाभीमानी जयंती साजरी केली जात आहे. पावतीमुक्त जयंती साजरी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती या नावाने भारतीय स्टेट बँकेत खाते उघडण्यात येते. कार्यकर्ते तथा समितीचे पदाधिकारी वर्गणी कुणाकडे मागत नाही. वर्गणीदाराने स्वइच्छेने स्वतांहा बँक खात्यात पैसे जमा करावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात येते. स्वइच्छेने जमा झालेल्या रक्कमेतून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सोहळा साजरा केला जातो. पैठण शहरात गेली आठ वर्षांपासून पावती मुक्त जयंती साजरी केली जात असल्याने सर्व धर्मिय नागरिक, व्यापारी, नौकरदार, राजकीय पुढारी, स्वताहून बँक खात्यात वर्गणी जमा करतात. जयंतीच्या दुसऱ्या दिवशी सोशल मिडीयावर सर्व समाज बांधवांना जमा,खर्चाचा हिशोब दिला जातो. ऐवढी पारदर्शकता पैठण शहरातील आंबेडकरी तरुण पाळतात. पावतीमुक्त जयंतीच्या माध्यमातून आंबेडकरी तरुणांनी सर्व समाज बांधवाचा विश्वास संपादित केल्याने मोठ्या प्रमाणावर बँकेच्या खात्यात रक्कम जमा होते. जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुमीत मगरे, कार्याध्यक्ष विनोद पोटफोडे, उपाध्यक्ष पंकज गायकवाड, अतुल पहिलवान, स्वागताध्यक्ष मनीष आठवले, सचिव चैतन्य बनकर, सहसचिव दिलीपराव चाबुकस्वार, कोषाध्यक्ष रामदास राठोड, महेंद्र साळवे आर्दीचा कार्यकारिणीत समावेश आहे.

# नवकार महामंत्राच्या गजरात छत्रपती संभाजीनगरात भव्य शोभायात्रा!

## नवकार फाउंडेशनचा अभिनव उपक्रम भाविकांच्या मनाला भिडला

छत्रपती संभाजीनगर - भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवाच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगरातील सकल जैन समाजाच्या भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. या शोभायात्रेत नवकार महामंत्राच्या प्रचार व प्रसारासाठी नवकार फाऊंडेशन तर्फे १० आकर्षक रथ सहभागी झाले होते. या रथांमधून नवकार महामंत्राचे अर्थ, महत्त्व आणि त्याचे आध्यात्मिक संदेश सखोलपणे विषद करण्यात आले होते.

प्रत्येक रथ एक वेगळी कथा सांगत होता. काही रथांवर नवकार मंत्राचे अर्थ मराठीमध्ये आकर्षक फलकांद्वारे दाखवण्यात आले होते, तर काही रथांवर अध्यात्मिक संदेश



देणाऱ्या चित्ररथांची मांडणी होती. यामुळे भाविकांना मंत्राचा गूढार्थ समजण्यास मदत झाली. रथांच्या आकर्षणामुळे मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला व मंत्राच्या गजरात सहभागी होत शोभायात्रेला साथ दिली.

प्रकल्प प्रमुख रवी मुगदिया म्हणाले की, नवकार महामंत्र हा जैन धर्मातील सर्वोच्च आणि अत्यंत पवित्र मंत्र आहे. तो सर्व साधू, मुनि आणि आत्मोन्नती साधणाऱ्या आत्म्यांना वंदन करणारा आहे. या मंत्रात पंच परमेष्ठींना (अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय, आणि साधू) वंदन करून त्यांच्या गुणांचे स्मरण केले जाते. हा मंत्र केवळ प्रार्थना नसून आत्मशुद्धीचा आणि मोक्षप्राप्तीचा मार्ग दर्शवणारा आहे.

या शोभायात्रेमुळे नवकार महामंत्राचे गूढ आणि त्याचे जीवनावर होणारे सकारात्मक परिणाम लोकांपर्यंत पोहोचले. असा अध्यात्मिक उपक्रम भविष्यातही आयोजित व्हावा, अशी भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली.

या नवकार रथासाठी प्रकल्प प्रमुख रवी मुगदिया, अनिलकुमार संचेती, विलास साहूजी, संजय संचेती, विनोद बोकडिया, राजेश मुथा, अजित जैन, रवी लोढा, निलेश जैन, पंकज साकला, हितेश कांकरिया, प्रकाश कोचेटा, अभिजीत हिरप, पियुष कासलीवाल, विकास रायमाणे, अमित काला, संतोष पापडीवाल आणि समीर ठोळे यांनी अथक परिश्रम घेतले.

# ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्यसंवर्धन आणि आयुर्वेदीय उपचार

मुंबई : आयुर्वेदामध्ये ६ ऋतूंचा उल्लेख आहे, जे भारत देशात निसर्गाने दिलेले आहेत हेमंत, शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा आणि शरद. होळीच्या सणासोबतच ग्रीष्म ऋतूचे आगमन होते. शिशिरानंतर वसंत ऋतूमुळे झाडांना नवीन पालवी फुटते. चारही बाजूंना हिरवळ पसरलेली असते, ज्यामुळे मनात एक नवीन उत्साह आणि आनंद निर्माण होतो. अशा वातावरणात सूर्यही हळूहळू आपल्या प्रखर किरणांनी उन्हाळ्याची चाहूल देतो.

ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्य स्वस्थ ठेवण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कारण सूर्यकिरणांच्या तिव्रतेमुळे उष्णतेचा त्रास होऊन शरिरात विविध त्रास उत्पन्न होतात. म्हणून आयुर्वेदानुसार उन्हाळ्यात अशा पदार्थांचे सेवन करावे जे शरिरातील पाण्याची कमतरता भरून काढतात. फळे आणि भाज्यांचे अधिक सेवन करावे. काकडी, कोशिंबीर, कांदा, पुदिन्याचा वापर अधिक करावा. भरपूर पाणी प्यावे.

सावधगिरी बाळगूनही कधी-कधी उन्हामध्ये फिरल्यामुळे उलटी, जुलाब, अपचन, पोटदुखी, ताप, लघवीला जळजळ, छातीत जळजळ, ॲसिडिटी इ. त्रास उत्पन्न होतात.

यासाठी आयुर्वेदात ग्रीष्म ऋतूच्या ऋतुचर्ये अंतर्गत आहार-विहाराचे विस्तृत वर्णन केले आहे. याचे पालन केल्यास अनेक आजारांपासून व त्रासांपासून बचाव होतो. तसेच काही औषधी पदार्थांचा उपयोग केल्यास आरोग्य सुदृढ ठेवता येते. या ऋतूमध्ये लिंबू, कैरी, बेलफळ यांच्यापासून तयार केलेल्या पानकाचे (सरबत) सेवन करावे. गुलकंद आणि आवळ्याचा मुरंबा खावा. काही विशिष्ट लक्षणे आढळल्यास त्वरित आयुर्वेदात वर्णित औषधोपचार घ्यावेत.

१) पित्त वाढल्यास : ताज्या डाळिंबापासून बनवलेले बैद्यनाथ दाडिमावलेह घ्यावे. यामुळे दाह कमी करून त्वरित थंडावा मिलतो. २) लघवीत जळजळ, वारंवार किंवा लालसर लघवी होणे असा त्रास होत असल्यास बैद्यनाथ गोक्षुरादि गुग्गुलु २ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ पाण्यासोबत घ्याव्यात. यासोबत बैद्यनाथ चंदनासव ४-४ चमचे जेवणानंतर दोन वेळा घ्यावे. ३) हैजा किंवा गॅस्ट्रो विकारया ऋतुत मोठ्या प्रमाणात जाणवतात पचनशक्ती कमी होऊन जुलाब होतात आणि शरीरातील पाण्याचे प्रमाणे कमी होते. अशावेळी बैद्यनाथ संजीवनी बटी घ्यावी. वारंवार आंवयुक्त जुलाब होत असल्यास बैद्यनाथ अमीबिका टॅबलेट १-१ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ पाण्यासोबत घ्यावी. ४) भूक न लागणे, अशक्तपणा व अरुची होणे, याप्रकारची लक्षणे जाणवल्यास बैद्यनाथ द्राक्षासव स्पेशल चे सेवन करावे. ५) ॲसिडिटी (अम्लपित्त) मध्ये आंबट ढेकर येणे, छातीत जळजळ होत असल्यास बैद्यनाथ सूतशेखर रस आणि बैद्यनाथ अविपत्तिकर चूर्ण घ्यावे. या प्रकारे ग्रीष्म ऋतूमध्ये योग्य काळजी घेतली आणि दिनचर्या संयमित ठेवली तर गर्मीमुळे होणारे त्रास टाळता येतात व वरील औषधांच्या सहाय्याने आरोग्य टिकविता येते.

नोट: आयुर्वेदिक औषधे वापरण्यापूर्वी आयुर्वेद तज्ञांचा सल्ला घ्यावा.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (८७) संघबंदी

महात्मा गांधींच्या हत्येनंतर संघावर प्रतिबंध लादला. त्यावेळी श्री. गुरुजी जेलमध्ये बंद होते. ते १९ महिने जेलमध्ये होते. त्यानंतर संघ निर्दोष ठरला. आणि गुरुजी निर्दोष सुटले. संपूर्ण मानव जातीवर प्रेम करणाऱ्या या महामानवाचा दिल्लीत सन्मान समारोह होता. भारतातील तसेच विश्वातील गणमान्य मान्यवरांची उपस्थिती होती. लाखो स्वयंसेवक जमले होते. ते त्यांच्या आदेशाची वाट पाहत होते. पण गुरुजींनी व्यासपीठावरून असे सांगितले जे काही घडले, ते विसरून जा. ज्यांनी आम्हाला करावासात डांबले ते सर्व आपलेच आहेत. दाताच्या मध्ये जीभ आली व जीभ दबली, तर आम्ही दात तोडतो का ? नाही. कारण दात आमचेच असतात. म्हणून सर्व काही विसरा व संघाच्या शाखा वाढवण्याच्या कामाला लागा. अगदी असेच २१ मार्च १९७७ ला इंदिरा गांधींच्या शासनाने संघावरील बंदी उठवली व त्यावेळी पूजनीय श्री बाळासाहेब देवरस कारागृहातून बाहेर आले. पुणे येथे त्यांचे स्वागत झाले. त्यावेळी स्पष्ट शब्दात संघाची भूमिका स्पष्ट करताना, आणीबाणी हे दुःस्वप्न होते, ते क्लेशदायक नक्कीच होते. तरी शासन व शासकही आपलेच आहेत. त्यामुळे सर्व काही झाले गेले विसरून जा. व क्षमाशील बना, असे उपस्थितांना ऐकवले. श्री गुरुजी व श्री देवरस या दोघांनीही सर्वेषाम् अविरोधेन हेच तत्व सर्वांनी अवलंबावे असे म्हटले. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती




## प्रतिष्ठान क्रेडिट सोसायटीच्या चेअरमनपदी इम्रान पठाण



तभा वृत्तसेवा

पैठण दि ११ : प्रतिष्ठान एम्पलोयीज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळाची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली प्रा. युवराज औटै, प्रा. विश्वास गव्हाणे, इम्रान पठाण, राजेश शिरवत, राजेश गोंडे, शरद वल्ले, रामेश्वर ढगे, प्रा.डॉ.अर्जुन मोरे, प्रा.डॉ.ममताराम करे, प्रा.डॉ.मनीषा काळे, प्रा. डॉ. सुवर्णा पाटील, विजय धोकटे, दीपक लसगरे यांची संचालक म्हणून बिनविरोध निवड झाली. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बलराम नवथर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या बैठकीत इम्रान पठाण यांची चेअरमन पदी, रामेश्वर ढगे यांची व्हा. चेअरमन पदी , खजिनदार पदी प्रा.युवराज औटे तर प्रा. विश्वास गव्हाणे यांची मानद सचिव पदी बिनविरोध निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रवींद्र पाटील शिसोदे, सचिव राजेंद्र पाटील शिसोदे, सुशील पाटील शिसोदे , प्राचार्य डॉक्टर एस जी सोनकांबळे , सर्व सभासद आदींनी अभिनंदन केले.

## वकील संघाकडून महात्मा ज्योतिबा फुले जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.११: गंगापूर तालुका वकील संघाकडून महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी वकील संघाचे अध्यक्षड.किशोर कऱ्हाळे सचिव विठ्ठल काळे सदस्य डी के तारू रविराज दारुंटे दत्तात्रय साबणे अविनाश कुलकर्णी अमोल रासकर बी के म्हस्के राहूल माघाडे टी व्ही कोल्हे शेखर कसाने एन टी आघाडे एस के दळवी अंकुश बरडे एन बी तोडकर व्ही जी खाजेकर एस बी शेख दत्ता पानकडे एस पी लबडे आदी सदस्य उपस्थित होते..

## भगवती विद्यालय बिडकीन येथे महात्मा ज्योतीबा फुले जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ११ एप्रिल पैठण तालुक्यातील भगवती विद्यालय, बिडकीन येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली प्रथम शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ राशीनकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले या कार्यक्रमाची सुरवात .प्रशालेचे मुख्याध्यापक एकनाथ राशींनकर यांनी विद्यार्थ्यांना महात्मा ज्योतीबा फुले यांच्या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ धनवे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीधर जऱ्हाड यांनी मानले, कार्यक्रम यशस्वीतेसाठी खुशाल चव्हाण,रायभान रक्ते, सुनील पवार, अप्पा किसवे, श्रीम विश्रांती सलगरे, आशुतोष झारगड, सुभाष राठोड बंडू डुबे यांनी सहकार्य केले. पसायदानाणे कार्यक्रम संपन्न झाला

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. १२ एप्रिल २०२५ वर्ष - तिसरे अंक ११ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## तामिळनाडूत झाली भाजपा - अण्णाद्रमुक युती



चेन्नई : तामिळनाडूत २०२६ मध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी आणि अण्णाद्रमुक या पक्षांनी युती जाहीर केली आहे. ही युती करत असतानाच भाजपाने तामिळनाडूसाठी नव्या अध्यक्षांची घोषणा केली आहे. तामिळनाडू भाजपाचे अध्यक्ष म्हणून नयनार नागेंद्रन सूत्र हाती घेत आहेत.

भाजपा - अण्णाद्रमुक युती तामिळनाडूत विधानसभेची निवडणूक लढवेल. ही निवडणूक अण्णाद्रमुकचे अध्यक्ष ई. पलानीस्वामी यांच्या नेतृत्वात लढवली जाईल, असे केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपा नेते अमित शाह यांनी जाहीर केले.

जागावाटप योग्य वेळी जाहीर होईल. निवडणूक जिंकल्यानंतर योग्य वेळी मंत्र्यांबाबतची घोषणा केली जाईल. दोन्ही पक्ष एकमेकांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाही; असे केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपा नेते अमित शाह यांनी सांगितले.

नयनार नागेंद्रन यांची तामिळनाडू भाजपाच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. निवडणुकीत नयनार नागेंद्रन यांच्या विरोधात कोणीही उभे राहिले नाही, असे सांगत अमित शाह यांनी त्यांचे अभिनंदन केले तसेच त्यांना शुभेच्छा दिल्या. तामिळनाडू भाजपाचे माजी अध्यक्ष के. अण्णामलाई, केंद्रीय मंत्री एल. मुरुगन, माजी केंद्रीय मंत्री पी. राधाकृष्णन, भाजपा आमदार आणि महिला मोर्चा अध्यक्ष वनाथी श्रीनिवासन यांनी नयनार नागेंद्रन यांच्या नावाचा प्रस्ताव तामिळनाडू भाजपाच्या अध्यक्षपदासाठी ठेवला होता. लवकरच के. अण्णामलाई यांच्याकडे पक्षाकडून नवी मोठी जबाबदारी सोपवली जाणार असल्याचे वृत्त आहे.

## व्यापारयुद्धाचा भडका उडाला, चिनी ड्रॅगन फुत्कारला

### अमेरिकेच्या १४५ टक्के टॅरिफला चीनचे १२५ टक्के टॅरिफने प्रत्युत्तर

बीजिंग : अमेरिका आणि चीन यांच्यात व्यापारयुद्धाचा भडका उडाला आहे. टॅरिफ अर्थात आयात शुल्क लावण्यावरुन दोन्ही देश इरेला पेटले आहेत. अमेरिकेने चिनी मालावर १४५ टक्के टॅरिफ लादला आहे. याला उत्तर म्हणून चीनने अमेरिकेतून आयात केल्या जाणाऱ्या मालावर १२५ टक्के टॅरिफ लादत असल्याचे जाहीर केले आहे. ट्रम्प प्रशासन चिनी मालावर टॅरिफ लादून आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या नियम आणि संकेतांचे उल्लंघन करत आहे, असे चीनने अमेरिकेवर टॅरिफ लादताना जाहीर केले.

बीजिंग स्टेट काउंसिल टॅरिफ कमिशनने अमेरिकेचा टॅरिफ बाबतचा निर्णय अनाकलनीय आणि हटवादी स्वरुपाचा असल्याचे सांगितले. अमेरिकेच्या आकड्यांच्या या खेळामुळे त्यांचेच नुकसान होणार आहे, असे मत चीनच्या जिनपिंग प्रशासनाने व्यक्त केले. अमेरिकेच्या टॅरिफच्या निर्णयाच्या विरोधात चीनने जागतिक व्यापार संघटनेकडे तक्रार नोंदवली आहे.

चीनने अमेरिकेच्या मालावर १२५ टक्के टॅरिफ लागू करतानाच अजून एक घोषणा केली आहे. अमेरिकेची इच्छा असेल तरच टॅरिफवर तोडगा काढण्यासाठी चर्चा होईल अन्यथा नाही, अशी ठाम भूमिका चीनने घेतली आहे. यामुळे अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापारयुद्ध आणखी तीव्र होणार की काही दिवसांनी थंडावणार यावरुन तर्कवितर्कांना उधाण आले आहे. अमेरिकेने चीन वगळता इर देशांवर लागू केलेले नवे टॅरिफ तात्पुरते स्थगित केले आहे. सर्व देशांशी चर्चा करणार आणि नवे व्यापारी करार करणार, असे अमेरिकेने जाहीर केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले दाखवणारी विशेष रेल्वे सुरु करणार

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले आणि आसपासची महत्त्वाची ऐतिहासिक स्थळे दाखवणारी विशेष रेल्वे लवकरच सुरू होणार आहे. या संदर्भातील माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

छत्रपती शिवाजी महाराज सर्किट ट्रेन सुरू होणार आहे. ज्यामध्ये सुंदर अशा प्रकारची आयकॉनिक रेल्वे सुरू होईल. यामार्फत दहा दिवसांची टूर केली जाईल. छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्ले, जागा, त्यांच्याशी संबंधित इतर सांस्कृतिक स्थळांना या रेल्वेद्वारे भेट देणे शक्य होणार आहे; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

विदर्भाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी गोंदिया - बल्लारशा रेल्वे मार्गाच्या दुहेकरीकरणाकरता ४ हजार ८१९ कोटी रुपये केंद्र सरकारने दिले आहेत. याचा फायदा विदर्भाला तसेच छत्तीसगड आणि तेलंगणालाही होणार आहे. केंद्र सरकार राज्यात रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चरवर १ लाख ७३ हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्टेशन्सच्या पुनर्विकासाचे काम केंद्र सरकार करत आहे. महाराष्ट्रातील सर्व महत्त्वाच्या स्थानकांचं वर्ड क्लास ट्रान्स्फर्मेशन होतंय. यावर्षी २३ हजार ७०० कोटी रुपये रेल्वे बजेटमध्ये राज्याला मिळाले आहेत. यूपीएच्या दहा वर्षांमध्ये दहा हजार कोटी रुपये एकत्रितपणे मिळाले नाहीत. पण आता महाराष्ट्राला दरवर्षी २३ ते २५ हजार कोटी रुपये फक्त रेल्वेशी संबंधित योजनांकरिता मिळत आहेत.

## जातीपातींचे राजकारण करुन सामाजिक विभाजनाचा काँग्रेसचा छुपा अजेंडा - संजय निरुपम



मुंबई : ओबीसी मतांसाठी काँग्रेसने केलेला ठराव निंदनीय असल्याची टीका शिवसेना उपनेते व प्रवक्ते संजय निरुपम यांनी आज केली. अहमदाबादमधील अधिवेशनात काँग्रेसने त्यांच्या मूळ भूमिकेशी पूर्णपणे युटर्न घेतला. जाती धर्माच्या आडून समाजात द्वेष पसरवणाऱ्यांविरोधात ठराव न करता, काँग्रेस नेतृत्वाने ओबीसींच्या मतांसाठी ठराव केला, यातून समाजाला जातीपातींमध्ये विभागण्याची काँग्रेसची भूमिका आहे, त्याचा तीव्र शब्दांत निरुपम यांनी निषेध केला. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

निरुपम पुढे म्हणाले की, काँग्रेस पक्षाची आजवर जी काही राष्ट्रीय अधिवेशन झाली त्यात देशासाठी, ग्रामस्वराज्यासाठी, आर्थिक उदारीकरणासाठी, बँकांच्या राष्ट्रीयकरणाचे ठराव मंजुर केले होते. प्रत्येक अधिवेशनात काँग्रेसकडून भारतीय समाजात जाती, भाषा धर्माच्या नावाने विभक्त करणाऱ्या शक्तींचा विरोध करणारा ठराव केला जात होता, असे निरुपम म्हणाले. मात्र अहमदाबादमधील अधिवेशनात काँग्रेसने पूर्णपणे यू-टर्न घेतला. जाती धर्माच्या आडून समाजात द्वेष पसरवणाऱ्यांविरोधात काँग्रेसने कोणताच ठराव केला नाही. याउलट काँग्रेस नेतृत्वाने ओबीसींच्या मतांसाठी ठराव केला, यातून समाजाला जातीपातींमध्ये विभागण्याचा काँग्रेसचा छुपा अजेंडा असून त्याचा तीव्र शब्दांत निषेध करतो, असे निरुपम म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, काँग्रेसची वाटचाल प्रादेशिक पक्षाच्या दिशेने सुरु झाली आहे. प्रादेशिक पक्षांकडून जाती धर्माचा आधारे व्होटबँकेचे राजकारण केले जाते, त्याप्रमाणे काँग्रेस राजकारण करणार हे निंदनीय आहे. ओबीसी मतांसाठी केलेला ठराव म्हणजे काँग्रेसचे दळभद्री राजकारण आहे, अशी घणाघाती टीका निरुपम यांनी केली.

काँग्रेसच्या जाती-जमातीवर आधारीत ठरावाला उबाठाची सहमती आहे का, असा सवाल निरुपम यांनी यावेळी केला. ते पुढे म्हणाले की मागील २५ वर्ष मुंबई महापालिकेवर उबाठाची सत्ता होती मात्र कधीही ते नालेसफाईची कामे पाहण्यासाठी गेले नाहीत. या उलट त्यांनी रस्त्यांची कामे, नालेसफाई आणि इतर कामांमधून कमिशन घेतले. आता सत्ता गेल्याने आदित्य ठाकरे रस्ते आणि नालेसफाईची कामे पाहण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. कामाची पाहणी करताना आदित्य ठाकरेंकडून कमिशन मिळवण्यासाठी कंत्राटदारांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा संशय निरुपम यांनी व्यक्त केला. नालेसफाईच्या कामांची पाहणी हे आदित्य ठाकरेंचे ढोंग आहे, असा टोला निरुपम यांनी लगावला. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून मुंबईत शहरात रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात आले, ज्यामुळे मुंबई खड्डेमुक्त झाल्याचे दिसून येते, असे निरुपम म्हणाले.

## एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दरमहा ७ तारखेला होईल : प्रताप सरनाईक



मुंबई : एसटी कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या ७ तारखेला होईल, याची जबाबदारी एसटी महामंडळाचे अध्यक्ष म्हणून माझी असेल! असे निः संदिग्ध आश्वासन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सर्व कर्मचाऱ्यांना दिले. ते एसटी मुख्यालयात महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारताना बोलत होते. यावेळी एसटी महामंडळाच्या संचालक मंडळाचे सदस्य व परिवहन आयुक्त विवेक भीमनराव एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ माधव कुसेकर व सर्व खाते प्रमुख उपस्थिती होते.

ते पुढे म्हणाले की, आर्थिक अडचणीमुळे एसटीत काम करणाऱ्या ८३ हजार कर्मचाऱ्यांना मार्च महिन्याचे वेतन केवळ ५६% देता आले, हे अत्यंत दुर्दैवी आहे. यापुढे महिनाभर कष्ट करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्याचा पगार दरमहा ७ तारखेला त्यांच्या बॅंक खात्यांत जमा करण्यात येईल! त्यासाठी राजशिष्टाचार सोडून महामंडळाचे अध्यक्ष म्हणून मी स्वतः अर्थ खात्याच्या अधिकाऱ्यांना भेटून विनंती करेन! परंतु आर्थिक अडचणीमुळे कर्मचाऱ्यांचे वेतन कधीही रखडणार नाही याची जबाबदारी मी घेईन, असे निः संदिग्ध आश्वासन मंत्री सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांना दिले.

यावेळी माध्यमांशी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले, एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर राज्यातील १३ कोटी जनतेला सुरक्षितता आणि किफायतशीर परिवहन सेवा देणारी एसटी ही महाराष्ट्राची लोकवाहीनी आहे. भविष्यात एसटी आर्थिक दृष्ट्या सक्षम करून प्रवासी जनतेला दर्जेदार दळणवळण सेवा देण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन. अर्थात, यासाठी एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सकारात्मक सहकार्य अपेक्षित आहे. त्यांच्या सहकार्या बरोबर शासन म्हणून सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मार्गदर्शन देखील लाभाणार आहे.

यापुढे एसटीला आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याबरोबरच परिवहन सेवा प्रवासीभिमुख व दर्जेदार करण्यासाठी काही चांगले निर्णय देखील आम्ही घेणार आहोत. त्यामध्ये सर्व बसस्थानकावरील प्रसाधनगृहे ही अत्याधुनिक पद्धतीची स्वच्छ व निर्जंतुक असतील. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विशेषतः महिला प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक बसस्थानकावर व नवीन येणाऱ्या बसेस मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, पॅनिक बटन, सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवणे, या वर भर देणार आहोत.

बसस्थानकांचे आधुनिकीकरण करणार..

बस स्थानकाचे आधुनिकीकरण करण्यासाठी खाजगी विकासकांच्या माध्यमातून बांधा- वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्त्वावर राज्यातील एसटीच्या बहुतांश जागा विकसित करण्यात येणार आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ६६ जागांची निविदा प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. यामध्ये संबंधित विकासकाने एसटीच्या जिल्हा स्तरांवरील जागे सह तालुका स्तरांवरील जागा व ग्रामीण भागातील जागा अशा ३ जागा विकसित करावयाची आहेत. त्यामुळे एसटीच्या अविकसित जागा देखील चांगल्या विकासकाकडून विकसित होतील.

२५ हजार बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार

सध्या एसटी महामंडळाच्या ताफ्यात असलेल्या सर्व जुन्या बसेस स्क्रॅप करण्यात येत असून त्याठिकाणी नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात येतं आहेत. यंदा २६४० लालपरी बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार असून त्यापैकी ११३ आगारात ८०० पेक्षा जास्त नवीन बसेस प्रवासी सेवेत रुजू झालेल्या आहेत. सध्या ३ हजार नवीन बसेसची निविदा प्रक्रिया सुरू असून भविष्यात ग्रामीण व दुर्गम भागात उपयुक्त ठरेल अशा मिडी बसेस घेण्यात येणार आहेत. तसेच शहरी भागातील उन्नत स्तरातील प्रवाशांसाठी २०० अत्याधुनिक, वातानुकूलित शयनयान बसेस लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी घेतल्या जातील. त्यामुळे भविष्यात शहरापासून गाव खेड्यांपर्यंत, महानगरापासून आदिवासी पाड्यापर्यंत एसटीची परिवहन सेवा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी केले.

## एनआयएला तपासात पूर्ण सहकार्य करु- देवेंद्र फडणवीस

### तहव्वुर राणाच्या चौकशी संदर्भात मुख्यमंत्र्यांची ग्वाही



मुंबई, ११ एप्रिल : मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या (२६/११) दहशतवादी हल्ल्याचा मास्टर माईंड तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आलेय. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधानांचे आभार मानलेत. तसेच एनआयएचा तपास आणि कायदेशीर प्रक्रियांमध्ये राज्य सरकार पूर्ण सहकार्य करेल अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई हल्ल्याचा आरोपी आणि कट रचणाऱ्या तहव्वुर राणाला भारतात आणण्यात आल्याने मला खूप आनंद झाला आहे. भारतीय न्यायव्यवस्थेला सामोरे जाण्यासाठी कट रचणाऱ्याला भारतात आणल्याबद्दल मुंबईकरांच्या वतीने मी पंतप्रधानांचे आभार मानतो. कसाबला कायद्यानुसार फाशी देण्यात आली, पण कट रचणारा आमच्या ताब्यात नव्हता. ते आमच्यासाठी एक ओझे होते. परंतु, कारस्थानी तहव्वुर राणा आता एनआयएच्या ताब्यात असून ते या प्रकरणाची चौकशी करत आहेत. आता एनआयए तपास आणि कायदेशीर प्रक्रियांबाबत निर्णय घेईल. आम्हाला जी काही माहिती हवी असेल ती आम्ही एनआयएकडून घेऊ. जर त्यांना कोणत्याही मदतीची आवश्यकता असेल तर आम्ही मुंबई पोलिसांमार्फत पूर्ण सहकार्य केले जाईल असे फडणवीस यांनी सांगितले.

तसेच मुंबई हल्ल्यांबद्दल दिग्विजय सिंह यांनी २०१० मध्ये केलेल्या टिप्पणीवर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुर्खासारखे बोलणाऱ्यांना आम्ही उत्तर देत नाही. जेव्हा कसाबला फाशी देण्यात आली आणि त्यानंतर डेव्हिड हेडलीचा आपल्या न्यायालयात जबाब नोंदवण्यात आला तेव्हा हे पूर्णपणे स्पष्ट झाले की हे संपूर्ण कट पाकिस्तानमध्ये रचण्यात आला होता. म्हणून इतर कट रचणाऱ्यांना मी उत्तर देऊ इच्छित नाही. आता मुख्य कट रचणारा आपल्या ताब्यात आहे आणि आणखी काही गोष्टी उघडकीस येतील असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

## ईडीने लोकांच्या मूलभूत हक्कांचा विचार करावा- सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली, ११ एप्रिल : अंमलबजावणी संचलनालयाने (ईडी) लोकांच्या मूलभूत हक्कांचा विचार करावा, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने आज, शुक्रवारी केली. छत्तीसगडच्या नागरिक आपूर्ती निगम (एनएएन) घोटाळा प्रकरण छत्तीसगडहून नवी दिल्लीला हस्तांतरित करण्याची मागणी करणाऱ्या ईडीच्या याचिकेवर सुनावणी करताना न्या. अभय ओक आणि न्या. उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने उपरोक्त टिप्पणी केली.

सर्वोच्च न्यायालयाने ईडीच्या वकिलांना विचारले की, त्यांनी घटनेच्या कलम ३२ अंतर्गत रिट याचिका कशी दाखल केली ? कारण कलम ३२ अंतर्गत याचिका दाखल करण्याचा मूलभूत अधिकार व्यक्तींना आहे, संस्थेला नाही. यानंतर अतिरिक्त महाधिवक्ता एस. व्ही. राजू यांनी याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली आणि सांगितले की ईडीलाही मूलभूत अधिकार आहेत. यावर खंडपीठाने म्हटले की, जर ईडीला मूलभूत अधिकार आहेत, तर त्यांनी लोकांच्या मूलभूत अधिकारांचाही विचार करावा. यानंतर न्यायालयाने ईडीला याचिका मागे घेण्याची परवानगी दिली. छत्तीसगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) साठी नोडल एजन्सी असलेल्या एनएएनच्या काही कार्यालयांवर २०१५ मध्ये, छापे टाकले होते. या छापेमारीत ३.६४ कोटी रुपयांची बेहिशेबी रोकड जप्त केली होती. याप्रकरणी ईडीने २०१९ मध्ये मनी लॉंडरिंग कायद्याअंतर्गत तक्रार दाखल केली होती. या घोटाळ्यात अनेक नोकरशहा आणि इतर मोठी नावे देखील आरोपी आहेत आणि अनेकांना अटक देखील करण्यात आली आहे. ईडीने हे प्रकरण छत्तीसगडबाहेर हस्तांतरित करण्याची आणि काही हाय-प्रोफाइल आरोपींना मिळालेला अटकपूर्व जामीन रद्द करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयात केली होती.

## सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रेच्या आरोपीला २१ एप्रिलला मिळणार शिक्षा



नवी मुंबई : सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे हत्याप्रकरणात नवीन अपडेट समोर आली आहे. अश्विनी बिद्रे हत्येप्रकरणात पोलीस निरीक्षक अभय कुरुंदकरला दोषी ठरवण्यात आलं आहे. लिव-इन पार्टनर अश्विनी बिद्रेची हत्या करुन तिच्या शरीराचे तुकडे करणे आणि त्यांची विल्हेवाट लावून पुरावे नष्ट करणे असे आरोप कुरुंदकरवर होते. न्यायालयाने कुरुंदकर आणि त्याच्या दोन साथीदारांना दोषी ठरवले आहे. दोषींच्या शिक्षेचा निर्णय न्यायालय २१ एप्रिल रोजी जाहीर करणार आहे. पनवेल सत्र न्यायालय निर्णय देणार आहे.

काय आहे नेमकं प्रकरण ?

अभय कुरुंदकर हे मुंबई पोलिसांच्या ताफ्यातील नावाजलेलं नाव होत. त्यांना राष्ट्रपती पदक सुद्धा मिळालं होतं. कुरुंदकर त्यांच्या सोबत काम करणाऱ्या अश्विनी बिद्रेच्या प्रेमात पडले. पण २००५ साली अश्विनी बिद्रेचं लग्न राजू गोरे नावाच्या व्यक्तीशी झालं. लग्नाच्या दोन वर्षांनी तिने महाराष्ट्र पीएससी उत्तीर्ण केली आणि पोलिसात सब-इन्स्पेक्टर झाली. तिचं पहिलं पोस्टिंग पुण्यात झालं. तीन वर्षांनंतर, अश्विनीची सांगलीला बदली झाली.

अश्विनीची हत्या झाली तेव्हा तिची मुलगी अवघ्या ६ वर्षांची होती. अश्विनीची पोस्टिंग रत्नागिरी येथे २०१३ मध्ये झाली. कुरुंदकरचे लग्न झालेले असूनसुद्धा तो अश्विनीसोबत लिव-इन पार्टनर म्हणून राहत होता. दोघांच्याही घरी याची कल्पना होती. अश्विनी २०१४ मध्ये तिच्या पतीपासून वेगळी झाली. मात्र अभयच्या घरी या घडामोडीची माहिती नव्हती.

अभय आणि अश्विनी नवी मुंबईत भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहू लागले. अश्विनीला २०१५ मध्ये बढती मिळाली आणि ती सहाय्यक पोलिस निरीक्षक बनली. बढती झाल्यानंतर ती ११ एप्रिल २०१६ रोजी बेपत्ता झाली. अश्विनीच्या भावाला आनंदला १५ एप्रिल रोजी फोनवर मेसेज आला की ती काही कामासाठी उत्तर प्रदेशला जात आहे आणि एका आठवड्यानंतर परत येईल. मेसेज आल्यामुळे अश्विनीच्या घरचे निवांत होते. मात्र एक दिवस अचानक अश्विनीच्या वडिलांना नवी मुंबई पोलिस मुख्यालयातून मोबाईलवर फोन आला आणि त्यांच्याकडे अश्विनीबद्दल चौकशी करण्यात आली.

अश्विनी दोन महिन्यांपासून कामावर आली नाही, असे त्यांना सांगण्यात आलं. पण कोल्हापुरात राहणाऱ्या अश्विनीच्या कुटुंबाला याबद्दल काहीच माहिती नव्हते. यानंतर अश्विनीचा शोध घेण्यात आला. पोलिसांनी चौकशी केल्यानंतर त्यांना अभय आणि अश्विनी यांच्या नात्याबद्दल स्पष्टता मिळाली. त्यानंतर पोलिसांनी अभयची चौकशी केली पण त्यांना काहीच सापडले नाही. काही दिवसांनी तपासादरम्यान पोलिसांना अश्विनीच्या लॅपटॉपमधून काही पुरावे सापडले ज्यावरून दोघांचे प्रेमसंबंध असल्याचे उघड झाले. पोलिसांना लॅपटॉपमध्ये एक व्हिडिओही सापडला ज्यामध्ये अभय अश्विनीला मारहाण करताना दिसला होता. तब्बल १० महिन्यांच्या तपासानंतर अभयने शरणागती पत्करली आणि अश्विनीचा खून केल्याची कबुली दिली.

अश्विनी आपल्यावर लग्न करण्यासाठी दबाव आणत होती, असे अभयने पोलिसांना सांगितलं. पण आपली इमेज जपण्यासाठी अभय हा त्याची पत्नी आणि मुलांना सोडण्यास तयार नव्हता. याच मुद्यावरून झालेल्या भांडणादरम्यान अभयने अश्विनीचा खून केला. कुऱ्हाडीने तिचे तुकडे करून ते फ्रीजमध्ये ठेवले. त्यानंतर जेव्हा संधी मिळाली तेव्हा त्याने मृतदेहाचे तुकडे भाईंदरच्या खाडीत फेकून दिले असल्याचं कबुल केलं. या घटनेनंतर अश्विनीच्या कुटुंबाने आणि तिच्या मुलीने आईला न्याय मिळावा यासाठी न्यायालयाचे दार ठोठावले. तब्बल ९ वर्षांनी न्यायालयीन लढाईत त्यांना यश मिळालं आहे. अश्विनीच्या मारेकऱ्याला आणि त्याच्या दोन साथीदारांना पनवेल न्यायालयाने दोषी ठरवले आहे.

न्यायालयात आतापर्यंत काय घडले ?

हत्येत पीआय अभय कुरुंदकर यांचा सहभाग असल्याचं समोर आलं. पनवेल सत्र न्यायालयात सुनावणीदरम्यान, अभय कुरुंदकर हेच दोषी असल्याचं आढळून आल्याने न्यायालयाने अभय कुरुंदकर यांना मुख्य दोषी ठरवलं. तसेच हत्येत सहभागी असलेल्या महेश फळणीकर, कुंदन भंडारी यांनाही न्यायालयाने दोषी ठरवलंय. तर कुरुंदकर यांचा वाहनचालक राजेश पाटीलला मात्र न्यायालयाने दिलासा दिला असून पुराव्या अभावी त्याची निर्दोष मुक्तता केलीयं.

## अग्रलेख...

# पुढच्या पराभवाची पूर्वतयारी!

पश्चिमेच्या क्षितिजास स्पर्श करणाऱ्या सूर्याच्या विभ्रमकारी कलांचे दर्शन झाल्यावर मन मोहून जाते. त्याच्या किरणांच्या शेकडो रंगछटा आसमंत उजळूनही टाकतात, तरीही त्याला कोणी सूर्योदय मानत नाहीत. तो मावळतीकडे झुकणाराच सूर्य असतो. हा सूर्य कितीही तेजस्वी भासत असला, तरी त्याचा अस्त ठरलेला असतो. देशाच्या पश्चिमेला गुजरात राज्यातील अहमदाबादेत सुरू असलेल्या काँग्रेस महासमितीच्या विस्तारित कार्यकारिणीच्या बैठकीत काँग्रेसचे नेते व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना भाषणाकरिता निमंत्रित करण्यापूर्वी त्यांचा उल्लेख 'नया सवेरा' असा करण्यात आला, तेव्हा तेथे टाळ्यांचा कडकडाट करून घोषणांचा पाऊस पाडणाऱ्या गांधीनिष्ठ काँग्रेसी भक्तजनांच्या मनात असाच भाबडा आशावाद उफाळून आला असेल.

एक गोष्ट नक्की झाली; ती म्हणजे, राहुल गांधी यांची वाटचाल त्यांच्या आजीच्या, म्हणजे इंदिरा गांधींच्या एकाच विचाराचे संस्कार सोबत घेऊन सुरू राहणार आहे. आपल्याला जे योग्य वाटेल तेच आपण करतो, लोक काय म्हणतील, भविष्यकाळ आपली कशी नोंद घेईल, याची पर्वा न करता, आपण आपल्या मार्गाने चालतच राहणार आहोत, असे राहुल गांधी यांनी स्पष्टपणे सांगितले. तेव्हा सभास्थानी किंचित टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला, पण राहुल गांधींना जे वाटते तसेच ते करणार या त्यांच्या भूमिकेमुळे, देशावर दीर्घकाळ सत्ता गाजविणारा, देशाचे नेतृत्व करणारा आणि महात्मा गांधी, सरदार पटेल यांच्यापासून मनमोहनसिंग यांच्यापर्यंतच्या दिग्गज नेत्यांचा वारसा सांगणारा हा पक्ष आज राहुल गांधींच्या दावणीला पुरता बांधला गेला आहे, याची जाणीव पक्षातील विचारी मनांमध्ये निश्चितच उमटली असेल. याच पक्षातील दोन नेत्यांच्या विचारसरणीमधील भिन्नतादेखील या निमित्ताने अधोरेखित झाली. भविष्यकाळ आपल्या कारकीर्दीची कशी नोंद घेईल, याची आपल्याला चिंता नाही. आपण आपल्या मार्गाने काम करीत राहणार, असे म्हणणाऱ्या इंदिरा गांधी आणि त्याच विचारांनी आपल्या कार्यपद्धतीची दिशा ठरविणारे राहुल गांधी या गांधी घराण्याच्या पिढ्यांच्या दरम्यान याच पक्षाने पंतप्रधानाच्या रूपाने डॉ. मनमोहनसिंग यांचेही नेतृत्व अनुभवले होते. भविष्यात मात्र जेव्हा आपल्या कामाचे मूल्यमापन केले जाईल, तेव्हा लिहिला जाणारा इतिहास आपली दखल निश्चितच घेईल, असे सांगणारे डॉ. मनमोहनसिंग याच पक्षाचे शिलेदार होते. त्यामुळे लोक काय म्हणतील, याची पर्वा न करणारे राहुल गांधी आणि भविष्यकाळाने नोंद घ्यावी, अशा कर्तबगारीचा ठसा उमटविण्याची उमेद बाळगून दाखविणारे संयत नेतृत्वशील मनमोहनसिंग हा काँग्रेसी परंपरेच्या विचारसरणीतील विसंगतीचा एक नमुना म्हणावा लागेल. देशाच्या पश्चिमेकडील गुजरातच्या किनाऱ्यावरून देशाच्या अतिपूर्वेकडील ईशान्येपर्यंत काँग्रेसचा झेंडा फडकविण्याची उमेद व्यक्त करणारा संकल्प या बैठकीत व्यक्त झाला. अर्थात, या संकल्पाच्या पूर्तीचे शिलेदार म्हणून अवघी काँग्रेस राहुल गांधी यांच्या नेतृत्वाकडे आशेने पाहात असल्याचेही या बैठकीत स्पष्ट झाले. त्यामुळे राहुल गांधींच्या मनात भविष्याविषयी काय चालले आहे आणि काँग्रेसच्या वाटचालीसंबंधी काँग्रेसजनांच्या भावना काय आहेत, याचे कल्पनाचित्र रंगतदार ठरू शकते. गेल्या १० वर्षांत असंख्य निवडणुकांमध्ये केवळ पराभव पाहावा लागणाऱ्या काँग्रेसने भविष्यातील विजयाचा संकल्प ज्या गुजरातच्या रणभूमीवरून सोडला, तेथील विधानसभा निवडणुकांना अद्याप सुमारे दोन वर्षांचा अवधी आहे. देशाच्या सत्ताकारणात महत्त्वाची भूमिका असलेल्या बिहार राज्यात या वर्षअखेरीस नोव्हेंबरात विधानसभेची निवडणूक होऊ घातली आहे. त्यापाठोपाठ २०२६ मध्ये पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि आसाममधील निवडणुका होतील आणि २०२७ मध्ये गुजरात विधानसभा निवडणूक होईल. देशाच्या कानाकोपऱ्यात विजयाचा झेंडा फडकावण्याची उमेद बाळगणाऱ्या या पक्षाने नजिकच्या भविष्यात निवडणुका असलेल्या कोणत्याही राज्यात पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक न घेता, दोन वर्षांनंतर निवडणुका असलेल्या गुजरातची निवड विजय संकल्पाचे रणशिंग फुंकण्यासाठी करावी, याचे अनेकांना आश्चर्य वाटलेही असेल. पण लोक काय म्हणतील, त्यांना काय वाटेल याची पर्वा न करता आपल्याला पाहिजे तेच आपण करणार, अशी स्पष्टोक्ती राहुल गांधी यांनी अगोदरच केलेली असल्याने, केवळ अनुयायाच्या भूमिकेतून गांधी घराण्याशी निष्ठा दाखविणाऱ्यांनी ते आश्चर्य दडपून ठेवले असेल. राजकीयदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या या राज्यांच्या निवडणुका काँग्रेसने बाजूला ठेवल्या असाव्यात का किंवा या राज्यातील विजयाविषयी पक्षश्रेष्ठींच्याच मनात शंका असाव्यात का, याची उत्तरे आता शोधावीच लागतील. अलिकडेच झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या एकूण कामगिरीतून त्या उत्तरांचे संकेत मिळालेलेच असल्याने काँग्रेस महासमितीच्या विस्तारित कार्यकारिणीची गुजरातेतील बैठक म्हणजे भविष्यातील विजयाचे रणशिंग फुंकण्याचा संकल्प की आगामी निवडणुकीतील पराजयाची पूर्वतयारी असेल, एवढेच आता ठरवायचे आहे.

भारतीय जनता पार्टीचा भक्कम बालेकिल्ला असलेल्या गुजरातमध्ये पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक घेऊन भाजपाला आणि गुजरातमध्ये नेतृत्व घडलेल्या नरेंद्र मोदी, अमित शहा यांना शह देण्याचा काँग्रेसचा इरादा आहे, हे स्पष्ट आहे. मात्र, काळ आणि वेळ यांचे गणित पाहता, या बैठकीचा प्रभाव हा राहुल गांधी यांनी भारत जोडो असे नाव देऊन केलेल्या देशभ्रमणाच्या प्रभावासारखाच ठरेल, याची जाणीव पक्षाच्या अनेक जाणत्या नेत्यांना असेलच. लोकसभेच्या निवडणुका तोंडावर येण्याआधी राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेचे निमित्त साधून देशाच्या कानाकोपऱ्यात भ्रमण केले, तेव्हा लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस हाच भाजपाला आव्हान देणारा समर्थ पर्याय ठरेल, असे अनेकांना वाटू लागले होते. इंडिया आघाडी या नावाने बांधलेली भाजपविरोधी पक्षांची मोट काँग्रेसच्या तंबूखाली आणण्याचे प्रयत्न झाले, पण राहुल गांधी यांनी आघाडीचे नेतृत्व करावे, यास अन्य पक्षांचे फारसे अनुकूल नसल्याचे स्पष्ट झालेच आणि लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर या यात्रेच्या प्रभावाच्या वातावरणाचा फुगा फुटून काँग्रेससह सर्वच विरोधकांना वास्तवाची आणि वर्तमानातील गलितगात्र राजकीय स्थितीची जाणीवही झाली होती. त्यामुळेच अन्यांची पर्वा न करता आपल्या मनाला वाटेल, तेच करण्याचा राहुल गांधी यांचा अट्टहासच त्या वेळीही पराभवास कारणीभूत ठरल्याची भावना पक्षातील बुजुर्ग नेत्यांनी व्यक्त केली, पण त्यांचा आवाज क्षीणच ठरला. आता पुन्हा राहुल गांधी यांनी स्वतःच्या मनास वाटेल तेच करण्याचा चंग बांधला आहे. लोकसभेच्या ताज्या निकालाच्या पुनरावृत्तीची ही पूर्वतयारीच असेल.

जाती-धर्मांच्या आधारावर देशातील लोकसंख्येचे विभाजन करणे ही फूट पाडणारी भूमिका ठरेल, असे भाजपा मानते, तर जातिनिहाय लोकसंख्येचे प्रमाण स्पष्ट झाल्यावर देशाच्या साधनसंपत्तीमध्ये कोणाची किती भागीदारी आहे हे निश्चित होईल, असा राहुल गांधींचा आग्रह आहे. अहमदाबादेतील बैठकीच्या सत्रामध्ये बोलताना त्यांनी या आग्रहाचा पुनरुच्चार केला. आगामी दीड ते दोन वर्षांत ज्या पाच राज्यांत विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत, त्यासाठी काँग्रेसी रणनीती काय असेल, याचे संकेत राहुल गांधी यांनी दिले आहेत, असे दिसते. याखेरीज महात्मा गांधी आणि सरदार वल्लभभाई पटेल यांचा वारसा सिद्ध करण्याचा काँग्रेसचा आटापिटा राहील, असेही स्पष्ट झाले. गुजरातमध्ये मोदी सरकारने उभारलेला सरदार पटेल यांचा जागतिक कीर्तीचा भव्य पुतळा आणि पटेलांच्या नेतृत्वाचा वारसा अंगीकारण्याचे भाजपाचे धोरण यामुळे आपल्या पूर्वसुरींवरील पक्षाचा हक्क हातून निसटू पाहात असल्याची अस्वस्थ जाणीव काँग्रेसमध्ये उमटली आहे. भाजपाची भक्कम पकड असलेल्या मुद्द्यांवर घाव घालण्याचा प्रयत्न काँग्रेसने सुरू केला असला, तरी हे मुद्दे हिसकावून आपली मोहोर त्यावर उमटविण्याची राहुल गांधी यांच्या नेतृत्वाची क्षमता असेल का, याची खात्री काँग्रेसला असेलच असे नाही. राहुल गांधींच्या नेतृत्वाने पराजयाचाच पायंडा पाडला असून पुढच्या निवडणुकांतही याच पराजयाच्या परंपरेची पुनरावृत्ती करण्याची पूर्वतयारी तर येथून सुरू झाली नसावी ना, असा प्रश्न बैठकीत उमटलेल्या एककल्लीपणाच्या अट्टहासी सुरातून जाणत्या काँग्रेसजनांना पडला असेल.

## प्रासंगिक

# आता बांगलादेशचे आव्हान

### प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

डॉ. मोहम्मद युनूस हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अर्थतज्ज्ञ असले, तरी चांगले राजकारणी नाहीत, हा अनुभव जगाला येत आहे. बांगलादेशला अडचणीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्याऐवजी ते चीनसारख्या देशाच्या पुढ्यात ढकलून मोकळे होत आहेत. त्यासाठी त्यांनी केलेल्या तत्त्वशून्य तडजोडींमुळे भारत आणि बांगलादेशचे संबंध सर्वात खालच्या पातळीवर पोहोचले आहेत. युनूस यांनी अलिकडेच केलेल्या वक्तव्यामुळे भारतातील लोक संतप्त झाले आहेत. युनूस चीनच्या दौऱ्यावर होते. या वेळी त्यांनी भारतावर दबाव आणण्यासाठी आणि चीनला खूश करण्यासाठी काही विधाने केली. युनूस यांनी चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत बीजिंगमध्ये बैठक घेतली. बांगलादेशमधील तांत्रिक आणि आर्थिक विकासाबाबत चर्चा केली. या भेटीत त्यांनी चीनला बंगालच्या उपसागरात येण्याचे आमंत्रण दिले. युनूस म्हणाले की, भारतातील ईशान्येकडील सात राज्यांना 'सेव्हन सिस्टर्स' म्हणून ओळखले जाते. हे भूपरिवेष्टित क्षेत्र आहे. चीन इथे गुंतवणूक करू शकतो, असे त्यांनी म्हटले. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ भारताची ईशान्येकडील सात राज्य भारतातील 'लॅण्डलॉक्ड एरिया' आहे. त्यांना समुद्रापर्यंत पोहोचण्याचा मार्ग नाही. या संपूर्ण परिसरात बांगला देश हा एकमेव समुद्राचा रक्षक आहे. या बढाईमुळे त्यांच्याबद्दल नाराजी पसरली.

'चिकन नेक' हा पश्चिम बंगालच्या शेजारी वसलेला एक अरुंद भाग आहे. हा २०-२२ किलोमीटर रुंद आणि ६० किलोमीटर लांब आहे. याला 'सिलीगुडी कॉरिडॉर' असेही म्हणतात. हा मार्ग ईशान्येकडील राज्यांना जोडतो. त्याला 'सेव्हन सिस्टर्स' असेही म्हणतात. हा कॉरिडॉर नेपाळ, भूतान, चीन, बांगलादेश या शेजारी राष्ट्रांनी वेढलेला आहे. चीनची नजर भारताच्या महत्त्वाच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'वर आहे. चीन तिबेट स्वायत्त प्रदेशा (टीएआर) च्या चुंबी खोऱ्यात आपला संपर्क मजबूत करीत आहे. हा भाग भारताच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'च्या जवळ आहे. 'सिलीगुडी कॉरिडॉर' हे केवळ व्यावसायिक आणि भौगोलिकदृष्ट्याच नाही, तर सामरिकदृष्ट्याही भारताचे महत्त्वाचे क्षेत्र आहे. पूर्व कमांडर लेफ्टनंट जनरल मनोज पांडे यांनी सिलीगुडीचे वर्णन संवेदनशील म्हणून केले होते. सर्वांचे लक्ष लडाख सीमेवरील 'पीपल्स लिबरेशन आर्मी'च्या अतिक्रमणावर असताना, चीन शांतपणे इतरत्र आपली आक्षेपार्ह क्षमता वाढवत आहे. यामध्ये भारताच्या 'चिकन नेक'जवळ भूतान प्रदेशातील रस्तेबांधणीचा समावेश आहे. पश्चिम बंगालमध्ये असलेला कॉरिडॉर ६० किलोमीटर लांब आणि २० किलोमीटर रुंद आहे आणि उत्तर-पूर्व भागाला उर्वरित भारताशी जोडतो. हा केवळ महत्त्वाचा व्यापारी मार्ग नाही, तर दक्षिण पूर्व आशियाचा एक महत्त्वाचा गेटवे आहे. हा प्रदेश बांगलादेश, नेपाळ, भूतान आणि चीनसह अनेक आंतरराष्ट्रीय सीमांनी वेढलेला आहे. तिबेटची चुंबी व्हॅली चिकन नेक कॉरिडॉरपासून फक्त १३० किलोमीटर अंतरावर आहे. युद्धाच्या प्रसंगी ती महत्त्वाची भूमिका बजावू शकते. 'सिलीगुडी कॉरिडॉर'ला रस्ते आणि रेल्वेने जोडलेले आहे. या कॉरिडॉरमधूनच त्यांना सर्व जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला जातो. युद्ध झाल्यास 'सिलीगुडी कॉरिडॉर'मधून शस्त्रे आणि सैन्य सहज जमवता येते. या महत्त्वाच्या क्षेत्राच्या रक्षणाची जबाबदारी भारतीय लष्कराची त्रिशक्ती कॉर्प्स पार पाडत आहे. भारतीय हवाई दलाने या प्रदेशातील हाशिमारा एअरबेसवर १८ फ्रेंच राफेल लढाऊ विमानांचा एक स्क्वॉड्रनदेखील तैनात केला आहे. तसेच, 'एमआयजी' विमानांचे सर्व प्रकार या भागात तैनात आहेत. त्याचबरोबर भारतीय लष्कराने ब्रह्मोस मिसाईल रेजिमेंट तैनात करून या भागाची सुरक्षा मजबूत केली आहे. 'सिलीगुडी कॉरिडॉर'ची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी भारतीय लष्कर आणि हवाई दलाने त्यांची लष्करी रचना आणखी मजबूत केली आहे. चीन आणि बांगलादेशच्या कारवाया पाहता भारत या प्रदेशात सर्व संभाव्य सुरक्षा उपाय करत आहे; जेणेकरून कोणत्याही संभाव्य आव्हानाला चोख प्रत्युत्तर देता येईल. 'बेल्ट ॲण्ड रोड इनिशिएटिव्ह' (बीआरआय) च्या माध्यमातून चीन आधीच बांगलादेशमध्ये आपली उपस्थिती वाढवत आहे. अशा स्थितीत युनूस यांच्या चीन दौऱ्याकडे भारताविरुद्धची मुत्सद्दी खेळी म्हणून पाहिले जाऊ शकते. काही काळापूर्वी 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ' जनरल अनिल चौहान यांनी चिकन नेक भागात सशस्त्र दलांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी उत्तर बंगालच्या अग्रेषित भागांना भेट दिली होती.

२०१७ मध्ये भारत-चीन-भूतान सीमेवरील त्रिकोणी भागात भारत आणि चीनचे सैन्य दोन महिने एकमेकांसमोर उभे ठाकले होते. या वेळी चीनने भूतानच्या भूभागातील डोकलाममध्ये रस्ता बांधण्याचा प्रयत्न केला होता. भारतीय लष्कराने भूतानच्या हद्दीत घुसून चीनला रस्ता बांधकाम थांबवण्यास भाग पाडले. चीनने डोकलाम पठार ओलांडून यशस्वीपणे रस्ता बांधला असता, तर सिक्कीमच्या 'सिलीगुडी कॉरिडॉर'ला धोका निर्माण करून ते जामफेरी रिजच्या जवळ पोहोचले असते.भारताने चिकन नेक भागात चीनची आक्रमकता रोखण्यासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत. ब्रह्मोस हे जमिनीवर हल्ला करणारे सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र आहे. भारत ते रशियाच्या सहकार्याने बनवते. हे क्षेपणास्त्र प्रचंड वेगाने २९० किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावरील लक्ष्य नष्ट करण्यास सक्षम आहे. भारताने ब्रह्मोस-ए ही ब्रह्मोसची हवाई प्रक्षेपित आवृत्ती विकसित केली आहे. त्याची रेंज ४०० किलोमीटर आहे. चीनला कोणत्याही लष्करी साहसापासून रोखण्यासाठी भारतीय लष्कराने चिकन नेक भागात ब्रह्मोस क्षेपणास्त्र रेजिमेंट तैनात केली आहेत. दसॉल्ट राफेल हे बहु-भूमिका असलेले लढाऊ विमान हवाई संरक्षण, हवाई अडथळे आणि आक्रमणाची भूमिका बजावू शकते. ब्रह्मोस जमिनीवर हल्ला करणाऱ्या क्रूझ क्षेपणास्त्रांसोबतच राफेल हवाई दलाला मजबूत आक्षेपार्ह शक्ती प्रदान करते.

एस-४०० पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली एस-४०० सॅम ही पृष्ठभागावरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली आहे, जी ४०० किलोमीटरहून अधिक अंतरावरील शत्रूची लढाऊ विमाने, क्रूझ आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे नष्ट करू शकते. भारताने रशियाकडून या प्रणालीच्या पाच रेजिमेंट पाच अब्ज डॉलर खर्चून खरेदी केल्या आहेत. त्यापैकी रशियाने भारताला तीन रेजिमेंट दिल्या आहेत. पाकिस्तान आणि चीनच्या पश्चिम आणि उत्तर सीमांचे रक्षण करण्यासाठी पंजाब प्रदेशात पहिली रेजिमेंट तैनात करण्यात आली होती. भारतीय हवाई हद्दीत चिनी लढाऊ विमानांचा प्रवेश रोखण्यासाठी 'सिलीगुडी कॉरिडॉर'मधील चिकन नेक भागात दुसरी रेजिमेंट तैनात करण्यात आली आहे. प्रगत आकाश प्रणालीमध्ये नवीन साधक तंत्रज्ञान, अंतराळ-कार्यक्षम डिझाईन आणि ३६०-डिग्री प्रतिबद्धता क्षमता समाविष्ट आहे. अर्थात या भागाच्या रक्षणासाठी भारताची संरक्षण सिद्धता झाली असली, तरी बेसावध राहून चालणार नाही. म्हणूनच युनूस यांच्या बेजबाबदार विधानांची देशभरात निंदा करण्यात आली.

## वेध

### संजय रामगिरवार

# 'कमवा-शिका' योजनेचे दुर्दैव!

*'किस उम्र तक पढा जाए,*
*किस उम्र तक कमाया जाए,*
*ये शौक नही, हालात तय करते है...'*

वैदर्भीय विद्यार्थ्यांची साधारणतः अशीच काहीशी स्थिती आहे. त्यांच्यासाठी उच्च शिक्षण आजही जिकरीचे आहे. कुठेतरी वाचल्याचे आठवते, अमेरिकेत म्हणे विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी पालकांकडून पैसेच घेत नाही तर कॉलेज संपल्यानंतर कुठेतरी अंशकालीन काम करतो आणि मिळालेल्या पैशातून शिक्षण घेतो. आपल्याकडे सर्वांची चिंता वाहण्याची संस्कृती आहे. बहुजनांच्या शिक्षणाचे वटवृक्ष म्हणून आपण ज्यांना ओळखतो ते रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजनेची मुहूर्तमेढ रोवली. पुढे साऱ्याच विद्यापीठांनी ती स्वीकारली. नव्याने स्थापन झालेल्या गोंडवाना विद्यापीठातही विद्यार्थी विकास विभागाद्वारे ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना राबविली जाते. ज्यांच्या पालकांचे उत्पन्न तीन लाखांच्यावर नाही, अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी महाविद्यालयात साधारणतः दोन-तीन तास बागकाम, गवत कापणे, वाचनालयातील पुस्तके व्यवस्थित ठेवणे, काही कार्यालयीन कामे करणे, ज्यांना टंकलेखन येते त्यांनी त्या कामात मदत करणे, ज्यांच्याकडे कौशल्य आहे त्यांनी विजेची किंवा प्लम्बिंगची कामे करणे आणि तासाला ५० रुपये याप्रमाणे महिन्यात एक ठरावीक रक्कम शिकता शिकताच कमावणे, अशी ही योजना आहे. हा पैसा त्यांच्या शिक्षणासाठी कामी यावा, अशी अपेक्षा या योजनेद्वारे केली जाते. गोंडवाना विद्यापीठाने गत वर्षीपर्यंत दोन भागात विभागलेल्या या योजनेसाठी ७० लाखांची तरतूद केली होती. आधीपासून लागू 'कमवा व शिका' योजनेंतर्गत २० लाख आणि विद्यापीठाच्या दशमानोत्सवानिमित्त लागू केलेल्या वीर बाबूराव शेडमाके 'कमवा व शिका' योजनेंतर्गत ५० लाख अशी अंदाजपत्रकातच तरतूद होती. आता मात्र, दोन्ही योजना एकत्र करून तब्बल ८० लाख रुपयांची तरतूद विद्यापीठाने केली आहे, ज्यासाठी हे विद्यापीठ अभिनंदनास पात्र आहे.



पण, या विद्यापीठाला एक तप पूर्ण झाले असतानाही कोविडपर्यंत 'कमवा व शिका' योजनेची साधी माहितीही महाविद्यालयांपर्यंत पोहोचली नव्हती; किंबहुना महाविद्यालयांनी ती गांभीर्याने घेतली नव्हती. ७० लाखांची तरतूद असतानाही २१६ संलग्नित महाविद्यालयांच्या या गोंडवाना विद्यापीठात केवळ ७ ते ९ महाविद्यालयांचेच प्रस्ताव येत असे. तरतूद केलेला निधी शिल्लक राहायचा. पण महाविद्यालयांकडून त्याचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नव्हता. हा मुद्दा विद्यापीठाच्या सिनेटमध्ये गाजला. नंतरच्या काळात विभाग गतिशील झाला आणि महाविद्यालयांत जाऊन-जाऊन प्रस्ताव मागितले गेले. तेव्हा कुठे गेल्या वर्षी दोन्ही योजनेतून प्रत्येकी २०-२० प्रस्ताव आलेत. या योजनेंतर्गत तरतूद वाढवून ७५ लाख रुपये विद्यापीठाने विविध महाविद्यालयांपर्यंत पोहोचविले.

आता या योजनेची खरी मेख किंवा दुर्दैव असे की, महाविद्यालये त्यांच्या प्रस्तावात भली मोठी यादी पाठवायचे आणि या योजनेतून विद्यापीठाने दिलेला पैसा आपल्या खात्यात जमा करायचे. तो पैसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही, अशी ओरड झाली आणि मग विद्यार्थी विकास विभागाने निर्णय घेऊन थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात या योजनेचे पैसे पाठवायला सुरुवात केली. असे होताच, अनेक महाविद्यालयांचा तिळपापड झाला. विद्यार्थी महाविद्यालयाच्या शुल्काची रक्कम भरत नाही म्हणून आम्ही या योजनेची रक्कम विद्यार्थ्यांच्या वतीने आमच्या खात्यात जमा करीत होतो. त्यामुळे ही रक्कम आमच्याच खात्यात टाका, अशी उलट ओरड सुरू झाली. खरे तर हा प्रकार या योजनेचा उद्देशच धाब्यावर बसवणारा आहे. मुळात खरेच विद्यार्थ्यांकडून कामे करवून घेतली जातात का, हाही प्रश्नच आहे. ज्यांच्याकडे शिक्षण शुल्क प्रलंबित आहे अशा विद्यार्थ्यांची नावे या योजनेसाठी विद्यापीठांकडे पाठविणे, त्यातून आलेला पैसा महाविद्यालयाच्या खात्यात वळता करणे अशी कामे काही महाविद्यालयांकडून होत आहे. त्यास आता अंकुश बसला म्हणून उलट ओरड सुरू झाली आहे. जे आधी मोठ्या प्रमाणात प्रस्ताव पाठवायचे त्यांचे प्रस्ताव येणे बंद झाले आहे. विद्यार्थी कल्याणच्या योजनेवर असा डोळा ठेवणे महाविद्यालयांच्या प्रशासनाला शोभते का, हा येथे गंभीर मुद्दा आहे. या कल्याणकारी योजनेला हरताळ फासणारा हा एकूणच प्रकार लांच्छनास्पद आहे.

९८८१७१७८३२

## दखल

# शरद पवारांच्या मनात काय?

### मोरेश्वर बडगे

शिल्लक राष्ट्रवादीचे सुप्रीमो शरद पवारांना समजून घ्यायला शंभर जन्म लागतील असे ठाकरे सेनेचे खासदार संजय राऊत म्हणाले होते, ते कधी कधी खरं वाटायला लागतं. सध्या सत्ताकारणात मोठ्या घडामोडी होत आहेत. पण शरद पवार गायब आहेत. त्यांनी अडीच वर्षाचे मुख्यमंत्रिपद देऊन फिटवलेल्या उद्धव ठाकरे यांची मात्र आदळआपट सुरू आहे. त्यामुळेच या दोघांचं नक्की चाललंय काय, असा प्रश्न पडतो. वक्फ सुधारणा विधेयक नुकतेच संसदेत संमत झालं. विरोधकांनी प्रतिष्ठेचा विषय बनवलेले हे महत्त्वाचे विधेयक. मात्र राज्यसभेतल्या मतदानाला शरद पवारांनी दांडी मारली. ठाकरे सेनेच्या खासदारांनी मात्र विरोधाची भूमिका पार पाडली. वक्फ विधेयक कुठल्याही परिस्थितीत पास होऊ देणार नाही अशी वेळोवेळी गर्जना करणाऱ्या शरद पवारांची ही गुगली काँग्रेसलाही चक्रावून गेली. वक्फला विरोध ही भूमिका 'इंडिया आघाडी'ने मागेच स्पष्ट केली असताना पवारांच्या असल्या वागण्याने संशयकल्लोळ वाढला आहे. पवार मतदानाला गेले असते तरी निकालात फरक पडला नसता. गायब राहून पवारांनी स्पष्ट संदेश दिला आहे. 'इंडिया आघाडी' संपली आहे. वक्फच्या मतदानाला न जाऊन पवारांनी 'इंडिया आघाडी'च्या शवपेटीवर शेवटचा खिळा ठोकला. पवारांनीच बाळंतपण केलेली महाविकास आघाडीही मोडीत निघाली आहे. तुम्ही पहा. या आघाडीतल्या घटक पक्ष नेत्यांची एकमेकांशी बोलती बंद आहे. बैठका दूर राहिल्या. भयाण शांतता आहे.

शरद पवारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींशी जुळवून घ्यायला सुरुवात केली आहे का? पुण्यात झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आमंत्रण द्यायला खुद्द शरद पवार मोदींकडे गेले होते. नागपुरात झालेल्या दंगलीविषयीही पवार फारसे बोलले नाहीत. संभ्रमावस्था हा पवारांचा 'डीएनए' आहे. स्वतःला संशयाच्या कोशात ठेवून पवार राजकारण खेळले. आज त्यांचे वय ८४ वर्षे आहे. मग पवारांना रिटायर व्हायचे आहे का? ते शक्य नाही. निवृत्ती हा शब्द पवारांच्या डिक्शनरीत नाही. अजून तर मुलीचं करीअरही 'सेट' झालेलं नाही. मनात आणलं असतं तर पवारांना सुप्रिया सुळे या आपल्या मुलीला केव्हाही मुख्यमंत्रिपदी बसवता आले असते; पण ते झालं नाही. आता करतो म्हटलं तर ते शक्य नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाचं किमान दोन-तीन निवडणुकीचं ॲडव्हान्स बुकिंग झालं आहे. मग या कोंडीत काय करणार? पुतण्या मागेच अख्खी पार्टी पळवून घेऊन गेला. आता शिल्लक पक्ष मुलीकडे देऊन मोकळे व्हायचे म्हटले तर पुन्हा पक्ष फुटणार. सुप्रिया सुळे यांचे नेतृत्व अनेकांना मान्य नाही. शरद पवारांकडे पाहून जुने सहकारी दिवस काढत आहेत. या वयातही शरद पवार दाबून राजकारण करू शकले असते. मात्र त्यांची विश्वासार्हता संपली आहे.



इतरांचे सोडा, त्यांचे जवळचे सहकारीही त्यांना विश्वासात घ्यायला तयार नाहीत. पवारांपुढे आता दोनच मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे भाजपाला पाठिंबा देऊन मोकळे व्हायचे. दुसरा मार्ग म्हणजे आपला उरलासुरला पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करून टाकायचा. पवार कुठेही जाऊ शकतात. सोनिया गांधी विदेशी आहेत, असे सांगून त्यांनी राष्ट्रवादीचे दुकान मांडलं होतं. थोडा दम घ्या. एक दिवस असाही येईल, ज्या दिवशी पवार म्हणतील, कोण ठाकरे?

महाराष्ट्राच्या राजकारणात एवढा चिखल कधीही झाला नव्हता. उद्धव ठाकरे यांच्या सत्तालोलूप स्वभावाने राजकारण पार नासवले. २०१९ च्या निवडणूक निकालानंतर उद्धव ठाकरे पवारांच्या सापळ्यात अडकले नसते तर आज महाराष्ट्राचे राजकारण काही वेगळे असते. ती निवडणूक भाजपा आणि शिवसेना यांनी युती करून लढवली होती. लोकांनी युतीच्या बाजूने कौल दिला. पवारांनी कान फुंकले. मुख्यमंत्री करतो म्हणाले. केवळ आणि केवळ मुख्यमंत्री व्हायच्या स्वार्थाने उद्धव तिकडे गेले. त्यांचे घोडे गंगेत न्हाले. मात्र अडीच वर्षांतच घरी बसावे लागले. तुम्ही इतिहास पहा. पवारांच्या मागे गेले ते सारे संपले. उद्धव ठाकरेंची शिवसेना भाजपासोबत होती तोपर्यंत ताकद होती. पवारांच्या नादी लागले तर बंड झाले नसते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेच्या ४० आमदारांनी बंड केले. भाजपासोबत सत्ता मिळवली. उद्धव यांचे हात आज रिकामे आहेत. पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले, मुख्यमंत्रिपद गेले. उद्धव यांचा डोळा मुस्लिम व्होट बँकेवर होता. हिरव्या लुंगीत आलो तर मुसलमानांची मतं मिळतील अशा भ्रमात ते होते. आपण हिंदुत्व सोडलेले नाही असे आजही उद्धव म्हणतात. पण त्यांनी जे धरले ते तमाम हिंदूंना जागं करून गेले. लोकसभा निवडणुकीत फेक नॅरेटिव्ह चालला. त्याचा भाजपाला तडाखा बसला. मोदींची उडी कमी पडली. त्या नंतर अवघ्या चार महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने चुकीची दुरुस्ती केली. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा बनू पाहणारी ठाकरे सेना अवघ्या २० आमदारांवर लोकांनी गुंडाळली. यातले १० आमदार तर मुंबईतले आहेत. पवारांच्या नादी लागण्याची फळं उद्धवच नव्हे तर काँग्रेसही भोगत आहे. महाराष्ट्रात पूर्वी चार पक्षात राजकीय लढाया व्हायच्या. शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फुटले. चारचे सहा पक्ष झाले. यातले दोन पक्ष २०२९ च्या निवडणुकीत संपलेले असतील. उद्धव आणि शरद पवार यांच्या पक्षांना भवितव्य नाही. शरद पवारांना तशीही शिवसेना संपवायची होती. संपेल. पवारांचं राजकारणही संपेल. पवारांनी कुठला पक्ष वाढवला आहे? एक उदाहरण सांगा. त्यांच्यासोबत गेले ते सारे संपले. भविष्यात भाजपा आणि राष्ट्रीय पक्ष म्हणून काँग्रेस असे दोनच पक्ष जिवंत राहतील. राष्ट्रीय पक्ष असल्याने इकडून तिकडून दोन आकडी स्कोअर काँग्रेसला मिळू शकतो. पण तुम्ही लिहून घ्या. काँग्रेस आता सत्तेत येणे शक्य नाही. राहुल नावाचा ब्रँड तीनदा लाँच करूनही फेल गेले. लोक मोदींना कंटाळतील तेव्हा आपलीच सत्ता अशा स्वप्नरंजनात राहुल गांधी आहेत. पण धर्मनिरपेक्षतेचा बागुलबुवा पुढे करून किती काळ वाचवायचे? काँग्रेसला वाचवण्याच्या धडपडीत आपल्याला हुतात्मा व्हावे लागेल, हे कार्यकर्त्यांनाही पूर्णपणे उमगू लागले आहे.

या पृष्ठभूमीवर भाजपाने अवघ्या ४४ वर्षांत कमावलेली कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे. विश्वासार्हता आणि राष्ट्रवाद या जोरावर भाजपाची ही कमाई आहे. २४ तास इलेक्शन मोडमध्ये असतो. मुख्य म्हणजे इच्छाशक्ती आहे. स्थापना दिनाच्या निमित्ताने भाजपाने उपराजधानी नागपुरात स्वतःचे प्रशस्त पक्ष कार्यालय उभे करायचे योजिले आहे. जुने कार्यकर्ते आनंदराव ठवरे यांनी या कामी स्वतःची देणगी जाहीर केली तेव्हा नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस यांसारख्या दिग्गज नेत्यांनी देणग्यांचा पाऊस पाडला. काँग्रेसलाही स्वतःचं टोलेजंग ऑफिस उभं करता आलं असतं. अनेक वर्षे काँग्रेसची राज्यात सत्ता होती. पण काँग्रेसवाले देवडिया भवनापलीकडे विचार करू शकले नाहीत. ३०-४० वर्षांपूर्वी भाजपाच्या कार्यकर्त्यांना खेड्यात घर शोधताना खूप विचार करावा लागे. आज भाजपा खेडोपाडी पसरला आहे. नितीन गडकरी यांची तपश्चर्या यामागे आहे. गडकरींनी विदर्भात भाजपा वाढवला. सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे अशा ताकदीचे नेते गडकरींनी पक्षात आणले. पुढे देवेंद्र फडणवीसांनी पक्षाला मोठ्या उंचावर नेले. 'हमारे पास गडकरी, फडणवीस है' असे कार्यकर्ते अभिमानाने म्हणतात. काँग्रेसवाल्यांकडे घ्यायला नाव आहे?

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## मंदिरांची संपत्ती आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी

प्रलंबित वक्फ विधेयक पारित झाल्यानंतर समाजामध्ये विविध प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. काहींनी या पृष्ठभूमीवर हिंदू मंदिरांचे सरकारीकरण करून त्यांच्या संपत्तीचा ताबा घेण्याची मागणी केली आहे. एका लेखात असे नमूद करण्यात आले होते की, मंदिरांमधील दानपेट्यांमध्ये कुजत पडलेल्या संपत्तीचा वापर देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी करावा. धर्मनिरपेक्ष देशामध्ये केवळ एका विशिष्ट धर्माच्या प्रार्थनास्थळांवरील संपत्तीचा ताबा सरकारने घेणे कितपत योग्य आहे? हा प्रश्न येथे उपस्थित होतो. शिवाय, मंदिरांमधील संपत्ती कुजत पडलेली असते, हा दावा चुकीचा आहे. तिरुपती बालाजी ट्रस्ट, शिर्डी साईबाबा ट्रस्ट, गुरुवायूर मंदिर ट्रस्ट यांसारख्या संस्था वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात कोट्यवधींची गुंतवणूक करीत असतात. म्हणजेच ही संपत्ती कुजत नाही, तर समाजोपयोगी कार्यात वापरली जाते. नुकत्याच पार पडलेल्या कुंभमेळ्यामुळे प्रचंड आर्थिक उलाढाल झाली. देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली. आंतरदेशीय पातळीवरील मोठे गुंतवणूकदार तेथे गुंतवणूक करायला उत्सुक आहेत. यावरून स्पष्ट होते की, मंदिर- कुंभमेळ्यासारखी धार्मिक आयोजने ही देशाच्या अर्थव्यवस्थेला हातभार लावणारी ठरतात. आता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न अत्यंत गंभीर आणि संवेदनशील आहे. केवळ कर्जमाफी हे एकमेव उपाय नाही. यामागील कारणे शोधायला हवीत. कुणी शेतीशिवाय अन्य कर्जातही अडकलेला असू शकतो, तर कुणी व्यसन आणि कमी कालावधीत जास्त उत्पन्न घेण्याच्या मोहात पडून नुकसान झालेला असू शकतो. शेतकऱ्यांना शाश्वत आधार देण्यासाठी शेतीसाठी समस्यांच्या मुळावर उपाय करणे आवश्यक आहे. व्यसन आणि प्रलोभनांच्या आहारी गेलेल्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी मार्गदर्शन करणे, मूलभूत सुविधा प्रदान करणे, प्रगत तंत्रज्ञान आणि त्याचे प्रशिक्षण देणे, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणे, सिंचन व्यवस्था, कृषी शिक्षण आणि सहकारी कंपन्यांची निर्मिती अशा विविध उपाययोजना करणे आवश्यक आहेत. म्हणूनच मंदिरांची संपत्ती वापरून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील, हा दृष्टिकोन व्यवहार्य नाही आणि तो एका बाजूने पक्षपाती ठरतो.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

## वाचक पत्रे

### हनुमंताच्या कार्यातून मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास

हजारो वर्षांपासून आपण रामभक्त हनुमानाची भक्ती करीत आलो आहोत. हनुमंताची दास्यभक्ती हे परमोच्च आदर्शाचे प्रतीक आहे. प्रभू रामासारख्याच उच्च स्थानावर हनुमंताचे स्थान आपल्या हृदयात आहे. हनुमंताचा जन्म चैत्र शुद्ध पौर्णिमेला झाला. जन्मताच त्यांनी आपल्या अद्भुत शक्ती चे प्रदर्शन केले आणि सूर्याला फळ समजून गिळण्यासाठी झेप घेतली. सप्तचिरंजीवांपैकी एक असलेले वीर हनुमान हे केवळ त्यांच्या शौर्यासाठीच प्रसिद्ध नाहीत, तर ते सकल शास्त्रांचे अभ्यासक होते. तत्त्वज्ञान, राजनीती, संगीत, भाषाशास्त्र, बुद्धीचे वरदान आणि वक्तृत्वकला या सर्व गुणांमध्ये ते पारंगत होते. आजकाल आपण मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वेगवेगळ्या वर्गांना प्रवेश देतो. मात्र, जर पालकांनी मुलांना हनुमानाचे चरित्र वाचायला दिले, तर त्यांच्या कार्यातून व विचारांमधून मुलांचा व्यक्तिमत्त्व विकास नक्कीच घडू शकतो. उदाहरणच द्यायचे राहिले तर रामायणातील एक प्रेरणादायी प्रसंग सांगू शकतो. भगवान श्रीराम सीतेचा शोध घेत असताना ऋष्यमूक पर्वताजवळ आले. त्यावेळी सुग्रीवाने त्यांना पाहिले. त्याला वाटले की, वालीनेच त्यांना आपल्याला मारण्यासाठी पाठवले आहे. म्हणूनच तो त्यांची पारख करण्यासाठी हनुमंताला पाठवतो. हनुमंत ब्राह्मणाचा वेष धारण करून श्रीराम आणि लक्ष्मण यांच्याकडे जातो. वेदशास्त्रसंपन्न असलेला हनुमंत आपल्या संभाषण चातुर्याने राम-लक्ष्मणाचा परिचय जाणून घेतो. अतिशय आदराने त्यांचे मनोगत जाणून घेतो आणि संपूर्ण खात्री झाल्यावरच आपले खरे रूप प्रकट करतो आणि रामाच्या चरणी नतमस्तक होतो. श्रीरामांनी मात्र त्याला केव्हाच ओळखलेले असते. दूत म्हणून संवाद कसा साधावा, याचा आदर्श हनुमंत दाखवतो. हनुमंताची रामभक्ती, समर्पण, चातुर्य, बुद्धिमत्ता, कौशल्य हे सगळं आत्मसात करायचे असेल तर हनुमानाला शरण जाऊया. उत्साहात आणि भक्ती भावात हनुमान जयंती साजरी करूया.

**रमा देशमुख**/नागपूर

### पाणीपुरवठ्याची समस्या

गेल्या अनेक दिवसांपासून लक्ष्मीनगर झोनमध्ये राहणाऱ्या नागरिकांना पाण्याची कमतरता भासते आहे. अनेक घरांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाहीये. चौकशी केली असता आमचे काम सुरू आहे. लवकरच सुरळीत पाणी पुरवठा सुरू होईल असा दिलासा मिळतो, परंतु अजूनही समस्येचे निराकरण झालेले नाही. त्यामुळे सामान्य जनता त्रस्त आहे. उन्हाळ्याच्या पृष्ठभूमीवर नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा व्हायला हवा. या संदर्भात मनपाकडे अनेक तक्रारी येतात. इतक्यात बरेच ठिकाणी दुरुस्तीचे काम हाती घेतल्याने तशी आगाऊ नोटीस देऊन पूर्ण दिवस पाणी पुरवठा बंद केला जातो. तो सुरू केल्यानंतर कमी दाबाने पाणी पुरवठा केला जातो. यावर तातडीने उपाययोजना व्हावी.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शासन निधी अभावी नगर परिषद करणार दैनंदिन कचरा संकलनाचे काम

## नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने दैनंदिन कचरा घंटागाडीत आणून टाकण्याचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ एप्रिल**

शासन निधी अभावी शहरातील मालमत्तेद्वारे दैनंदिन निर्माण होणारा कचरा संकलन करणे व त्याअनुषंगाने कामे नगर परिषद स्वनिधीतून करणार आहे. नागरिकांनी मालमत्तेद्वारे निर्माण होणारा दैनंदिन कचरा हा स्वत:हून नगर परिषदेच्या घंटागाडीत स्वयंस्फूर्तीने आणून टाकण्याचे आवाहन मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी केले आहे.

शहरातील सर्व मालमत्तेद्वारे निर्माण होणारा दैनंदिन कचरा संकलन करणे करिता शहरातील सर्व प्रभागांमध्ये घंटागाडीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदरील दैनंदिन कचरा संकलन करिता घंटागाडी, त्यांचे इंधन, मनुष्यबळ आदी सर्व खर्च हा शासनामार्फत प्राप्त होणाऱ्या १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून मागील सात ते आठ वर्षापासून करण्यात येत होता. परंतु मागील वर्षीपासून हिंगोली नगर परिषदेस शासनाचा १५ व्या वित्त आयोगाचा निधी अप्राप्त असल्यामुळे सदरील सर्व उपाययोजना या हिंगोली नगर परिषद स्वखर्चातून करणार आहे.

शहरातील नागरिकांमार्फत मालमत्ता करामध्ये अंतर्भूत असेले युजर चार्ज हा शहरातील मालमत्ताद्वारे निर्माण होणारा कचरा संकलन करणेकरिता लागणाऱ्या व्यवस्थेकरिता आकारला जातो. शासनामार्फत हिंगोली शहर हे कचरामुक्त शहर म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यानुसार आपले शहर कचरामुक्त ठेवणे हे नागरिकांचेही कर्तव्य आहे. दैनंदिन कचरा संकलन करणे व त्याअनुषंगीक कामे करण्याकरिता शासनामार्फत प्राप्त होणारा निधी आणि त्याप्रमाणात नगर परिषदेचा स्वनिधी यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे. त्यामुळे दैनंदिन कचरा संकलन करणे करिता लागणारा खर्च व नगर परिषदेचा निधी यामध्ये सांगड घालण्याच्या दृष्टीकोनातून दैनंदिन कचरा संकलनाकरिता कंत्राटदारांमार्फत पुरविण्यात येणारे मनुष्यबळ नगर परिषद कमी करणार असून नगर परिषदेकडे उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाद्वारे यापुढे दैनंदिन कचरा संकलन करण्यात येणार आहे. त्यानुसार हिंगोली शहरातील दैनंदिन कचरा संकलन करणे करिता प्रभागामध्ये येणाऱ्या घंटागाडीवरील यापुढे हेल्पर नसणार आहे. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन निर्माण होणारा घरगुती ओला कचरा, सुका कचरा, घातक कचरा हा विलगीकरण करून तो स्वत: नगर परिषदेच्या घंटागाडीमध्ये टाकून नगर परिषदेला सहकार्य करण्याचे व शहर कचरामुक्त ठेवण्यास हातभार लावावा असे आवाहन मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी केले आहे.



हिंगोली– येथील बाजारपेठेत सध्या मोठ्या प्रमाणात फळांचा राजा आंबा विक्रीसाठी येत असून प्रतिकिलो १५० ते २०० रूपये भावाने विक्री होत आहे. आंबा खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करीत आहेत. छाया– सुनील पाठक

# वनविभागाकडून वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ एप्रिल**

उन्हाळ्यात वन्य प्राणी पाण्याच्या शोधात मानवी वस्तीमध्ये जाऊ नये यासाठी वन विभागाने कृत्रिम पाणवठे आणि जलसंधारणाच्या कामातून प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. याशिवाय पाणवठ्यांवर ट्रॅप कॅमेरे बसवून त्या ठिकाणच्या हालचालींची नोंदही घेतली जात आहे.

जिल्ह्यात औंढा नागनाथ, सेनगाव, कळमनुरी, हिंगोली या तालुक्यात मोठ्या प्रमाणावर जंगल आहे. यामध्ये रोही, हरीण, काळवीट, कोल्हा, वानर, ससे आदी प्राणी वास्तव्य करीत आहेत. उन्हाळ्यात हे प्राणी पाण्याच्या शोधात परिसरातील शेतात किंवा मानवी वस्तीमध्ये जातात. यातून शेती पीकांचे नुकसान होते तर मानवी वस्तीमध्ये वन्य प्राणी धुमाकुळ घालण्याच्या प्रकारामुळे नागरिकांना इजा होण्याची शक्यता आहे.

ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी मानवी वस्तीमध्ये येणारे प्राणी व मानवांमध्ये होणारा संघर्ष टाळण्यासाठी वन विभागाने जिल्ह्यात कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत. सेनगाव व औंढा नागनाथ तालुक्यात कृत्रिम पाणवठ्यांची संख्या सुमारे ३० पेक्षा अधिक आहे. सदर पाणवठे उन्हाळ्यामध्ये भरले जातात. याशिवाय विभागीय वनाधिकारी डॉ राजेंद्र नाळे, वनपरिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जंगलामधून जलसंधारणाची कामेही करण्यात आली आहेत. त्यामुळ सुमारे ९० पाणवठे तयार झाले आहेत. उन्हामुळे सध्या वन्य प्राणी मानवी वस्तीकडे येऊ नयेत यासाठी कृत्रीम पाणवठ्यांमध्ये पाणी भरले जात आहे. यामुळे वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय झाली आहे.

# सभापती राम शिंदे, मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ एप्रिल**



सकल मराठा समाज जिल्हा हिंगोली च्या वतीने छत्रपती घराण्याचे वंशज शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

सकल मराठा समाज जिल्हा हिंगोलीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा परिसरात बुधवार दि.९ एप्रिल रोजी छत्रपती घराण्याचे वंशज, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले व सभापती प्रा.राम शिंदे यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळयास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. छत्रपती शिवेंद्रराजे भोसले हे पहिल्यांदाच हिंगोली येथे आल्यानंतर भव्य सत्कार शेतकरी बैलगाडी सन्मानचिन्ह व पुष्पहार हार देऊन करण्यात आला. तसेच विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा.राम शिंदे यांचा सत्कार सकल मराठा समाजाच्या वतीने सन्मान चिन्ह व पुष्पहार हार देऊन करण्यात आला. यावेळी आ.तान्हाजी मुटकुळे, माजी आ. रामराव वडकुते यांची प्रमुख उपस्थिती होती. याच कार्यक्रमामध्ये स्थानिक मा.नगरसेवक उमेशमामा गुठ्ठे, राजु यादव यांनी छत्रपती शिवेंद्रराजे भोसले व प्रा.राम शिंदे यांचा सत्कार केला. यावेळी सकल मराठा समाजाचे समाज बांधव व भगिंनी मोठया संख्येने उपस्थित होते.



हिंगोली– येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत योजनांचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले आहेत. सदरील पैसे उचलण्यासाठी सकाळपासून बँकेसमोर शेतकरी लांबच लांब रांगेत उभे राहत आहेत. परंतु कडक उन्हांमध्ये त्यांना तासनतास ताटकळत उभे ठाकावे लागत आहे. छाया– विजय गुंडेकर

## संक्षिप्त वृत्त

### अमृत स्वायत्त संस्थेची बैठक संपन्न



हिंगोली– नुकतीच महाराष्ट्र शासनाच्या अमृत या स्वायत्त संस्थेची बैठक मंगळवाऱ्यातील संतश्रेष्ठ पाचलेगावकर महाराज मठ येथे संपन्न झाली. यामध्ये उपस्थितांना महा अमृत अभियानाची माहिती तसेच योजनांची माहिती देण्यात आली. खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी स्थापन करण्यात आलेल्या 'अमृत' संस्थेच्या विविध योजनांचा लाभ आता तुमच्या दारी या ब्रीदवाक्यास अनुसरून अमृत परिवार नोंदणी, विद्यार्थ्यांसाठी 'अमृत क्लब, महिलांसाठी अमृत सखी मंच, व्यवसायिकांसाठी 'अमृत पेठ', मार्गदर्शन कार्यशाळा, सांस्कृतिक स्पर्धा अशा अनेक उपक्रमांची माहिती याप्रसंगी अमृतचे उपव्यवस्थापक उल्हास दिवाळकर यांनी दिली. यादरम्यान, १००% लाभार्थ्यांपर्यंत योजनांची पोहोच करण्याचा आपला मानस असल्याचे व एकही पात्र लाभार्थी, योजनांपासून वंचित राहू नये यासाठी १००% प्रयत्न असल्याचेही उपव्यवस्थापक उल्हास दिवाळकर यांनी सांगितले. याप्रसंगी अमृतचे उपव्यवस्थापक उल्हास दिवाळकर, अमृत मित्र संजय मेथेकर, सहप्रमुख शुभम भालेराव, संजय जोशी, मनोज जोशी, मकरंद तालखेडकर आदी उपस्थित होते.

### वृक्ष जगविण्यासाठी चालक संघटनेचा पुढाकार



हिंगोली– येथील जय एकता वाहन चालक-मालक संघटनेच्या वतीने उन्हाचा पारा वाढल्यामुळे वृक्षांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी उन्हाळ्यामध्ये वाहन मार्केट मधील वृक्षांना पाणी टाकण्याचे कार्य हे संघटनेच्यावतीने सुरू ठेवण्यात आले आहे. त्यामुळे उन्हाळ्यातही ही झाडे जगत असून सावली देत आहेत. एकता वाहन चालक मालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप ठाकरे, सचिव विवेकानंद जी भिसे, कोषाध्यक्ष पृथ्वीराज खंदारे, जिल्हा उपाध्यक्ष आरिफ भाई वासेसा, रितेश ठाकरे, हितेश ठाकरे, गौतम खडसे, जिल्हा संपर्कप्रमुख अंकुश घोडके, अक्षय पुंडगे, बबन गिरी, ज्ञानेश्वर जगताप, पद्माकर बलांडे, अक्षय गायकवाड, वैभव वामन, रियाज शेख आदींची यावेळी उपस्थिती होती. वाहन चालक व मालक संघटनेच्या या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये महात्मा फुले जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ एप्रिल**

सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु.) नांदेड येथेमहात्मा फुले जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शाळेतील सहशिक्षक खंडेराव जोगदंड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महात्मा फुले हे जगातील एकमेव सत्यशोधक समाजसुधारक असल्याचे सांगितले. त्यांनी असेही नमूद केले की, त्यांचे विचार समग्र मानवी समाजाच्या कल्याणासाठी प्रेरणादायी आहेत. कार्यक्रमातशाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांनीही आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या, महात्मा फुले यांनी खऱ्या अर्थाने समाजातील शोषित, वंचित, उपेक्षित बहुजनांच्या हितासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले आहे. त्यांच्या विचारांचे अनुकरण प्रत्येकाने केले पाहिजे. या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले तसेच सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खंडेराव जोगदंडयांनी केले आणि आभार प्रदर्शन अरविंद काळेवार यांनी मानले.

# पालकमंत्री झिरवळांनी केलेले ३६ कोटींचे पुनर्विनियोजन वादाच्या भोवऱ्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ एप्रिल**

जिल्ह्यातील आमदारांच्या शिफारशींना बगल देत पालकमंत्री नरहरी झिरवळांनी नाशिकमध्ये बसून केलेले जिल्हा नियोजन समितीच्या ३६.५० कोटींचे पुनर्विनियोजन वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या प्रकरणात भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली आहे. त्यामुळे जिल्ह्यात महायुतीमध्ये वादाची ठिणगी पडली आहे.

हिंगोली जिल्ह्यासाठी सतत बाहेरचे पालकमंत्री दिले जात असल्यामुळे नेमके जिल्ह्यातील प्रश्नांची त्यांना कदाचित माहीतीही होत नाही. त्यातच केवळ ध्वजवंदनाचे सोपस्कार पूर्ण करणारेच पालकमंत्री मिळत असल्यामुळे जिल्ह्यात विकास कामांच्या नियोजनाचे तीन तेरा वाजले आहेत. पालकमंत्र्यांच्या स्वीय सहायकांना भेटणाऱ्या कंत्राटदारांच्याच कामांना मंजूरी मिळणार असेच काहीसे चित्र जिल्ह्यात पहावयास मिळत आहे. एका माजी पालकमंत्र्याच्या तथाकथीत पीएने चक्क निधी ढापून ठेवत चांगलाच धुमाकुळे घातल्याची चर्चा अजूनही सुरूच आहे.

त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातीलच पालकमंत्री द्यावा अशी मागणी जोर धरू लागली होती. मात्र महायुतीचे तीनही आमदार विजयी झाल्यानंतरही त्यांना बाजूला ठेवीत नाशिक जिल्ह्यातील मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या गळ्यात पालकमंत्रीपदाची माळ घातली. मात्र झिरवाळांनी पूर्वीच्याच पालकमंत्र्यांची री ओढली असल्याचे चित्र आहे.

हिंगोली जिल्ह्यात जिल्हा नियोजन समितीने ३६.५० कोटी रूपयांचे पुनर्विनियोजनाचे प्रस्ताव तयार केले होते. मात्र सदर प्रस्ताव नाशिक येथे मागविल्यानंतर त्याठिकाणी त्यांच्या स्वीय सहायकांच्या मर्जीनेच कामे मंजुर करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने तीर्थक्षेत्र विकास, रस्ते, जनसुविधा योजना, आरोग्य विभागाच्या कामांचा समावेश आहे. मात्र सदर कामे मंजूर करतांना आमदारांनी केलेल्या शिफारशींना बगल देण्यात आली आहे. या मंजूर कामांची यादी जिल्हा नियोजन समितीकडे प्राप्त झाल्यानंतर आमदारांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. यासंदर्भात आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून आमदारांच्या शिफारशीनुसार कामे मंजूर केली नसल्याचा आरोप केला आहे. कामे स्थगित करण्याची मागणी केली आहे.

# अंशुल सरनायक यांचा जिल्हा पत्रकार क्रिकेट संघातर्फे सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ एप्रिल**



येथील पत्रकार गोपालराव सरनायक यांचा मोठा मुलगा चि. अंशुल गोपालराव सरनायक हा जर्मनी येथे मास्टर्स इन डेटा सायन्स हा कोर्स करण्यासाठी जात असल्यामुळे हिंगोली जिल्हा पत्रकार क्रिकेट संघ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

जर्मनी येथील ट्रायर या शहरात ट्रायर युनिव्हर्सिटी मध्ये मास्टर इन डेटा सायन्स हि दोन वर्षाची पदवी अभ्यासक्रम करण्यासाठी अंशुल सरनायक जात असल्यामुळे त्याचा सत्कार पत्रकार क्रिकेट संघाचे कर्णधार शिवाजीराव मेटकर यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी राकेश भट्ट, प्रसाद आर्वीकर, प्रद्युम्न गिरीकर, सचिन कावडे, दिलीप हळदे, सुधाकर वाढवे, मयूर नखाते, विजय गुंडेकर, रमेश वाबळे, सुनील पाठक, गोपालराव सरनायक, निलेश गरवारे आदींची उपस्थिती होती. यावेळी पत्रकारांच्यावतीने जर्मनी अभ्यास करण्यासाठी शुभेच्छा देऊन जास्तीत जास्त चांगल्या पद्धतीने यश संपादन करावे अशा शुभेच्छा देत त्यांच्या आई-वडील तसेच परिवाराचे अभिनंद केले आहे.

# शहर वाहतुक शाखेकडून ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह अंतर्गत वाहन चालकांची तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ एप्रिल**



हिंगोली शहर वाहतूक शाखेच्या वतीने सायंकाळी शहरातील नांदेड नाका परिसरात ड्रंक अँड ड्राईव्ह तसेच अवैद्य प्रवासी वाहतूक संदर्भात संदर्भात विविध दुचाकी चार चाकी वाहनांची तपासणी करण्यात आली.

आतापर्यंत १२६ वाहनांवर केसेस करून त्यावर २,४२,९०० रुपयाचा दंड आकारण्यात आला. सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे यांचे आदेशाने वाहतूक शाखेचे, सहायक पोलीस निरीक्षक तांबोळी, पीएसआय घुमनर, वाहतूक पोलीस कर्मचारी शेषराव राठोड, गजानन राठोड, गजानन दांडेकर, कपिल जाधव, राजकुमार सुर्वे, शिवाजी पारस्कर यांनी केली आहे. कोणीही दारू पिऊन वाहन चालवेल, कर्कश आवाजाचे वाहन वापरेल, ट्रिपल सीट वाहन चालवेल, लहान मुलाला वाहन चालवण्यास देईल, राँग साईड वाहन चालवेल, वाहन चालवताना मोबाईलवर संभाषण करेल, त्यांचेवर शहर वाहतूक शाखेच्या पोलिसामार्फत कडक कारवाई करण्यात येईल. वाहन चालविताना नियमाचे पालन करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## 'राजमाता' त महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातील राजमाता जिजामाता विद्यालय, तुळजाभवानी विद्यालय, राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज व संगमेश्वर विद्यामंदिरात शुक्रवारी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते



पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य केंद्रे यांनी, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, समन्वयक अश्विनी केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, वैशाली केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजेंद्र जायेभाये, समन्वयक राजीव मुंढे, राणी केंद्रे, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड यांच्यासह अन्य प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### देशमुख महाविद्यालय ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने युगप्रवर्तक क्रांतीबा ज्योतिबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभिक प्रा. संतोष कल्याणकर, आणि अंकुश थडकर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.अंगद कोते, डॉ. अजित भांजी, प्रा.महारुद्र बिडवे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. दशरथ भिसे, प्रा. चंद्रकांत मोरे, प्रा. विवेक जाधव, क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, प्रा. नंदा खरटमल, स्टाफ सचिव डॉ. जयदेवी पवार, प्रा. बालिका गौंड यांची प्रमुख उपस्थिती होती. अभिवादन कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सामाजिक समता सप्ताह अंतर्गत मार्जिन मनी कार्यशाळेला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समाज कल्याण विभागामार्फत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या अंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि वंचित दुर्बल घटकांतील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांविषयी जनजागृती करण्यात येत आहे. त्यानुसार लातूर येथील वैशाली बुद्ध विहार येथे मार्जिन मनी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करून, तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे वाचनाने कार्यशाळेला सुरुवात झाली. यावेळी उपस्थितांना मार्जिन मनी योजनेविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाला समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी, तसेच वैशाली बुद्ध विहारचे सचिव केशव कांबळे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. परिसरातील युवक-युवतींनी या कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

### लातूर कॉलेज ऑफ फार्मसीत स्वसंरक्षण प्रशिक्षण उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी लातूर महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि सशक्तिकरणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत तीन महिन्याचे स्वसंरक्षण प्रशिक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.

हा उपक्रम मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यास आणि त्यांना स्वतःचे संरक्षण करण्यास व सक्षम बनवण्यास मदत करेल ,त्याकरिता विद्यार्थिनीच्या स्वसंरक्षण, योगसाधना ,मेडिटेशन ,मूलभूत आरोग्य तपासणी इत्यादी कार्यक्रम राबविण्याचे निर्देश तंत्रशिक्षण संचनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये मेडिटेशन हा उपक्रम घेण्यात आलेला आहे. याप्रसंगी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे ,सचिव वेताळेश्वर बावगे ,संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला,प्रा कदम अतुल ,प्रा.सुप्रिया जाधव, प्रा.माधुरी पोळकर, प्रा मनकरना कराळे , आदि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

### साखरा शिवारातून दुचाकी लंपास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** साखरा शेतशिवारात पार्किंग केलेल्या दुचाकीची चोरी झाल्याची घटना ३ एप्रिल रोजी घडली. याबाबत साहेबराव बाबासाहेब देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गातेगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद आहे.

## तरुणाईला 'आडोसा' देणाऱ्या २८ कॉफी शॉपवर कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** विशिष्ट कम्पार्टमेंट बनवून शाळकरी आणि महाविद्यालयीन जोडप्यांना 'आडोसा' देणाऱ्या लातूर शहरातील २८ कॉफी शॉपवर बुधवारी सायंकाळी उशिरापर्यंत पोलिसांनी कारवाई केली. कॉफी शॉपच्या नियमानुसार आपले आस्थापना चालवावेत, अन्यथा कडक कारवाई करण्यात येईल, अशी तंबी पोलिसांकडून देण्यात आली.

गेल्या काही महिन्यांपासून लातूर शहरात मोठ्या प्रमाणात कॉफी शॉपचे पेव फुटले आहे. असे बहुतेक शॉपचालक सर्व नियम धाब्यावर बसवून अश्लील चाळे करणाऱ्या शाळकरी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना पोषक

> **कायदेशीर कारवाई करा : जिल्हाधिकारी**
>
> काही कॉफी शॉपधारक हे बेकायदेशीरपणे कॉफी शॉप चालवित असल्याचे निदर्शनास आले आहे. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी सदरची बाब जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या निदर्शनास आणून दिली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी २० जून २०२३ पासून लातूर जिल्ह्यातील कॉफी शॉप तसेच हॉटेलचालकांसाठी नियमावली जारी केली आहे. यात सीसीटीव्ही फुटेज असणे बंधनकारक आहे. सर्व दरवाजे पारदर्शक काचेचे असावेत. बैठक व्यवस्था सर्व ठिकाणी स्पष्ट दिसेल अशी असावी. अंतर्गत बंदिस्त कम्पार्टमेंट असू नयेत. सक्षम प्राधिकाऱ्यासाठी भेट पुस्तिका ठेवावी. धुम्रपानास सक्त मनाई असावी. कॉफी शॉप व हॉटेल्स हे शासनाने दिलेल्या वेळेतच सुरू ठेवावेत, आदी नियमांचे पालन न केल्यास कॉफी शॉप व हॉटेलचालकांविरुध्द कायदेशीर कारवाईचे आदेश जिल्हाधिकारी ठाकूर यांनी दिले आहेत.

वातावरण व बैठक व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहे.

हा प्रकार लक्षात आल्यानंतर पोलिसांनी बुधवारी सायंकाळी उशिरापर्यंत पोलिसांकडून विशेष मोहीम राबविण्यात आली.

कॉफी शॉप मालकांनी त्यांच्या शॉपमध्ये बंदिस्त कम्पार्टमेंट तयार केल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस



अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत यांच्या नेतृत्वात शहरातील चार पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी आणि त्यांच्या पथकांनी शहरातील विविध कॉफी शॉपवर अचानक धाड टाकून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली.

या कारवाईत २८ कॉफी शॉपला भेटी देऊन त्यातील ३ कॉफी शॉपमधील बंदिस्त कम्पार्टमेंट त्यांच्या चालकांमार्फत तोडण्यात आले. तसेच १० कॉपी चालकधारकांना नोटीस बजाविण्यात आली. ज्या आस्थापनाधारकांनी नियमांचे उल्लंघन केले आहे, त्यांचे परवाने रद्द करण्यासाठी पोलिसांकडून कारवाई करण्यात येत असून भविष्यात कठोर कारवाईचा इशारा पोलीसांनी दिला.

## भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** सकल जैन समाज लातूरच्या वतीने भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी साडेसहा वाजता अनिल जैन , शिरीष रामढवे, धनंजय कोंडेकर यांच्या हस्ते कलश पूजन व ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर भगवान महावीरांच्या प्रतिमेची पालखी मिरवणुक जल्लोषात काढण्यात आली पटेल चौक खडक हनुमान जीवराज भवन दयाराम रोड सुभाष चौक गंजगोलाई हनुमान चौक गुळ मार्केट मार्गे वर्धमान उद्यान येथे सांगता झाली त्या ठिकाणी नूतन मनपा आयुक्त श्री जाधव साहेब व अजितलालजी आळंदकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले दुपारी दिगंबर जैन मंदिर येथे



भगवान महावीराच्या जिनबिंबाची अभिषेक पाळणा नामकरण विधी द्वारे भक्ती करण्यात आली.

त्यानंतर आर्यिका वात्सल्यमती माताजी यांचे आशीर्वचन झाले त्यांनी आपल्या प्रवचनात जीवनात सत्य अहिंसा अपरिग्रह अनेकांत या मूल्यांचे महत्त्व सांगितले व जियो और जीने दो शाकाहार आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले याप्रसंगी जैन मंदिर व जीवराज भवन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते जवळपास ८० रक्तदात्यांनी रक्तदान केले महाप्रसादाचे वाटप जैन मंदिर येथे करण्यात आले दिवसभराच्या कार्यक्रमाला जैन समाजातील श्रावक श्राविका युवक युवती यांची प्रचंड संख्या होती कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व मंदिरचे विश्वस्त मंडळ युवक मंडळ महिला मंडळ यांनी अथक परिश्रम घेतले अशी माहिती दिगंबर जैन मंदिरचे अध्यक्ष महावीर उदगीरकर यांनी दिली आहे.

## जिल्हा वकील मंडळाच्या अध्यक्षपदी योगेश जगताप विजयी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** जिल्हा वकील मंडळाच्या निवडणुकीत यावेळी पहिल्यांदाच पाच पॅनलमध्ये चुरशीची लढत झाली. या निवडणुकीत मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. योगेश जगताप, उपाध्यक्ष ॲड. संजय जगदाळे, महिला उपाध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा ॲड. मनीषा दिवे पाटील विजयी झाले आहेत. सचिवपदी ॲड. गणेश गोजमगुंडे विजयी झाले आहेत.



जिल्हा वकील मंडळाची कार्यकारिणी निवडीसाठी बुधवारी सकाळी ७.३० ते सायंकाळी साडे चारपर्यंत मतदान झाले. १ हजार ६३१ पैकी १ हजार ३२२ वकील मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. लातूर जिल्हा वकील मंडळाच्या कार्यकारिणीसाठी बुधवारी निवडणूक झाली. त्यात सहसचिव ॲड. नीलेश मुचाटे, महिला सहसचिव ॲड. अभिलाषा गवारे, ग्रंथालय सचिव ॲड. प्रणव रायचूरकर, कोषाध्यक्ष ॲड. गणेश कांबळे विजयी झाले आहेत. सायंकाळी सात वाजता मतमोजणी सुरू झाली. पहाटे साधारण ५.३० वाजेपर्यंत चालली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. शोभा गोमारे दुड्डे, ॲड. महेश खणगे, रुक्मिणी भोसले तर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. दौलत दाताळ, ॲड. किरण चिंते, ॲड. नयना देवताळकर, ॲड. सुमेधा शिंदे, ॲड. युवराज इंगोले, ॲड. पवन पाळणे, ॲड, सर्फराज मणियार, ॲड. कोमल राठोड यांनी कामकाज पाहिले. त्यांना कार्यालयीन कर्मचारी प्रकाश मसलगे, सुशील सुरवसे, विष्णू जाधव यांनी साह्य केले. सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा मावळत्या कार्यकारिणीने सत्कार करून स्वागत केले.

## ३४ अड्ड्यांवर धाडी; ५७ जणांना अटक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** जिल्ह्यातील ३४ अड्ड्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने धाडी टाकल्या. यात चोरट्या मार्गाने दारूची वाहतूक करणाऱ्या, गुन्ह्यांत वापर असलेली १९ वाहने पथकांनी जप्त केली. ३० गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. यावेळी ७ लाख ८८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क नांदेड विभागाचे विभागीय उपाधीक्षक बी. एच. तडवी यांच्या निर्देशानुसार लातूरचे अधीक्षक केशव राऊत यांच्या आदेशानुसार विशेष गुन्हा अन्वेषणाच्या मोहिमेच्या अनुषंगाने ३० मार्च ते ९ एप्रिल अखेर लातूर जिल्ह्यात अवैध मद्य निर्मिती, विक्री, चोरट्या मार्गाने वाहतुकीविरोधात लातूर, उदगीर, निलंगा, चाकूर विभागाने मोहीम राबविली. ५७ जणांना अटक केली. यावेळी हातभट्टी दारू ९६ लिटर, देशी ३५१, विदेशी दारू १८ लिटर जप्त करण्यात आली.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक आर.एम. कोतवाल, आर. एम. चाटे, आर. व्ही. कडवे, यू. व्ही. मिसाळ, दुय्यम निरीक्षक आर. डी. भोसले, एन. टी. रोटे, एस. आर. राठोड, एस. के. वाघमारे, बी. आर. वाघमोडे, एन. डी. कचरे, व्ही. पी. राठोड, बी. एल. येळे, एस. डी. घुले, एस. पी. काळे, डी.डी. साळवे, बी. एच. आशमोड, एस. पी. मळगे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गणेश गोळे, नीलेश गुणाले, मंगेश खारकर, षडाक्षरी केंगारे, गजानन होळकर, जवान अनिरुध्द देशपांडे, सुरेश काळे, सौरभ पाटवदकर, सोनाली गुडले, ज्योतिराम पवार, श्रीकांत साळुंके, संतोष केंद्रे, कपील गोसावी, प्रथमेश फत्तेपुरे आदींनी केली.

## सोयाबीन दरात सुधारणा, आवकमध्ये वाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** गुढी पाडव्यानंतर शेतीमालाच्या दरात सुधारणा होत आहे. ४ हजार प्रतिक्विंटलवर असलेले सोयाबीन आता ४ हजार ५०० रुपयांपर्यंत पोहचले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून वाढत्या दराचा परिणाम आवकवर देखील झाला आहे. गुरुवारी येथील बाजार समितीमध्ये १२ हजार ८०० क्विंटलची आवक झाली होती.

शेतीमालाच्या आवकवर येथील उलाढाल ठरली जाते. गेल्या वर्षभरापासून सोयाबीनचे दर सरासरी ४ हजार रुपयांपर्यंतच स्थिरावले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी विक्रीपेक्षा साठवणुकीवरच भर दिला होता. अनेकांनी हमीभाव केंद्राचा आधार घेतल्यानंतर पुन्हा सोयाबीन हे थप्पीलाच ठेवले होते.



गुढीपाडव्यानंतर सर्वच शेतीमालाच्या दरात सुधारणा होत आहे. ४ हजारांवर असलेले सोयाबीन आता ४ हजार ४५० रुपयांवर पोहोचले आहे. त्यामुळे सोयाबीन विक्रीवर शेतकऱ्यांचा भर आहे. तर हरभऱ्याला ५ हजार ८८०, तूर ७ हजार २५० तर करडईला ६ हजार रुपये प्रति क्विंटल दर मिळत आहे. ऐन खरिपाच्या तोंडावर शेतीमालाच्या दरात सुधारणा होत असून शेतकऱ्यांसाठी हे दिलासादायक आहे.

रबी हंगामातील ज्वारी, हरभरा, करडई आणि राजमा पिकांची काढणी अंतिम टप्प्यात आहे. गेल्या वर्षभरापासून घटलेल्या दरामुळे आवकवर परिणाम झाला होता. आता वाढीव दर स्थिर रहावे अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

## मराठवाड्यातील अमली पदार्थांचे कनेक्शन चिंताजनक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत विकासाची कास धरलेल्या लातूर धाराशिवसह मराठवाड्यात उघड झालेले अमली पदार्थाचे कनेक्शन ही चिंतेची बाब असून पोलीस यंत्रणेने विशेष मोहीम राबवून या व्यवसायाची पाळेमुळे उखडून टाकावीत, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

शिक्षण, उद्योग, व्यापार, कृषी, सहकार आणि आरोग्य सेवेचे केंद्र म्हणून नावारूपाला येत असलेल्या लातूर जिल्ह्यातील काही लोक अमली पदार्थ निर्मिती तसेच विक्रीच्या प्रक्रियेत गुंतल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली राज्यातील पोलीस यंत्रणा नेमके काय करीत आहे, हा प्रश्न आता निर्माण झाला आहे. अत्यंत प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीतही, जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर मराठवाड्यातील जनता प्रगतीच्या वाटा शोधण्याचा प्रयत्न करीत असताना अलीकडच्या काळात छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, लातूर या जिल्ह्यात चुकीच्या प्रवृत्तीचा प्रवेश होऊन अवैध व्यवसाय वाढू लागले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर येथे अमली पदार्थांच्या व्यवसायाचे कनेक्शन उघड झाल्यानंतर, त्याचे लोण आता बीड, धाराशिव, लातूरपर्यंत येऊन पोहोचले आहे.

लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यात रोहिणा येथे एमडी ड्रग्ज निर्मितीचा उद्योग सुरू असल्याचे उघड झाले आहे. असल्याचे आ. अमित देशमुख यांनी म्हटले आहे.

## १८ तास अभ्यासातून महामानवाला अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त भारतीय बौध्द महासभा, जिल्हा शाखा लातूर व १३४ वी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी महात्मा फुले जयंतीच्या पूर्वसंध्येला सलग १८ तास अभ्यास उपक्रम राबविण्यात आला. याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात नेहमी १८ तासांपेक्षा जास्त वेळ अभ्यास करून भारताची राज्यघटना लिहिली, त्या महामानवाला सलग १८ तास अभ्यास करून जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी अभिवादन केले. या उपक्रमाचे उद्घाटन गुरुवारी पहाटे ५ वाजता सिध्दार्थ हाउसिंग



सोसायटीतील सिध्दार्थ बुध्द विहार येथे पूज्य भिक्खू महावीरो थेरो, पूज्य भिक्खू पय्यानंद थेरो, भारतीय बौध्द महासभेचे राज्य संघटक प्रा. बापूसाहेब गायकवाड, जिल्हाध्यक्ष आशाताई चिकटे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, नांदेड येथील आंबेडकरवादी मिशन स्पर्धा परीक्षा केंद्राचे दीपक कदम, महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी समाधान सूर्यवंशी यांनी स्पर्धा परीक्षेविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या उपक्रमाचा समारोप गुरुवारी रात्री १२ वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांना पूर्णाकृती पुतळास्थळी अभिवादन करून झाला. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे बीएसएनएलचे महाप्रबंधक अनिल बनसोडे, भारतीय बौध्द महासभेचे राज्य संघटक डी. एस. नरसिंगे, राज्य संघटक दैवशाला गायकवाड, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे सचिव राहुल कांबळे, अभिमन्यू लामतुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## व्हेंटिलेटरशिवाय मनोहरेंनी घेतला चार तास नैसर्गिक श्वास

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ११ एप्रिल -** महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्यावर मुंबईच्या कोकिळाबेन रुग्णालयात रोबोटिक उपचार सुरू आहेत. मनोहरे यांच्या प्रकृतीत झपाट्याने सुधारणा होत आहे. गुरुवारी त्यांच्या प्रकृतीत चांगलीच सुधारणा झाल्याचे दिसून आले. व्हेंटिलेटरशिवाय त्यांनी तब्बल चार नैसर्गिक श्वास घेतल्याने ते धोक्याच्या बाहेर गेल्याचे समजत आहे.

लातूर महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी लातूर येथील त्यांच्या निवासस्थानी शनिवारी डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यांच्या मेंदुवर येथील सह्याद्री हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यानंतर पुढील रोबोटिक उपचारासाठी त्यांना मुंबईच्या कोकिळाबेन रुग्णालयात सोमवारी (दि.७) एअर लिफ्ट करण्यात आले होते. तेथे गेल्यानंतर मनोहरे यांच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत आहेत. बुधवारी त्यांच्या डोळ्यांसह उजव्या हात-पायांच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. समोरच्या व्यक्तीच्या बोलण्याला ते प्रतिसाद देत आहेत. त्यांची व्हेंटिलेटरची मात्राही कमी करण्यात आली होती.

गुरुवारी दुपारी दोन ते सायंकाळी सहा या वेळेत त्यांचे व्हेंटिलेटर पूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. तब्बल चार तास मनोहरे यांनी नैसर्गिक श्वास घेतला. यामुळे ते या आजारातून लवकर बाहेर येतील, असे डॉ. सदानंद कांबळे यांनी सांगितले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ढेमसा नृत्यातुन गोंडी संस्कृतीचे संगोपन व संरक्षण: आ. भीमराव केराम



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.११ एप्रिल-**

दहा हजार वर्षांपूर्वीची अलिखित गोंडी संस्कृती नृत्य व गायनाच्या रूपाने आजही जिवंत आहे.गोंडी कलावंतात हा अनुवंशिक वारसा असल्याचे स्पष्ट करत ढेमसा नृत्यातून गोंडी समाजाच्या संस्कृतीची संगोपन व संरक्षण होण्यास मदत होते असे मौलिक प्रतिपादन आमदार भीमराव केराम यांनी केले आहे.

आदिवासी सरपंच- उपसरपंच संघटना, कर्मचारी संघटना,युवासमाज व आदिवासी समाजबांधवांच्या वतीने क्रांतिवीर बाबुराव पुल्लेसुर शेडमाके यांच्या जयंतीनिमित्त येथील हुतात्मा गोंडराजे शंकरशहा रघुनाथशहा मैदानात भव्य गोंडी ढेमसा स्पर्धेचे आयोजन केले होते.या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी आमदार केराम बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी सभापती एड. माधवराव मरसकोले हे होते तर मंचावर गोंडीगीतकार, कवी पांडुरंग मेश्राम, सुप्रसिद्ध गोंडी गीतकार व कवी शैलजा शेख, उपअभियंता श्री सलाम साहेब आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. पुढे बोलताना आ. केराम म्हणाले की गोंडसमाज संपूर्ण भारत देशात विखुरलेला आहे.दहा हजार वर्षांपूर्वीची अलिखित गोंडीसंस्कृती गायन व नृत्याच्या रूपाने आजही जिवंत आहे. गोंडी समाजात जन्मजातच गायन,वादन व नृत्याविष्काराची कला अवगत आहे.गोंडी ढेमसा नृत्यातुन भारत देशाची मूळसंस्कृती प्रतीत होते. हा मूळ गोंडी सांस्कृतिक वारसा टिकून ठेवण्यासाठी असे कार्यक्रम ठीक ठिकाणी भव्य स्वरूपात आयोजित होणे आवश्यक आहे. क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या कार्याची महती पटवून देताना ते म्हणाले की, जल जमीन आणि जंगलच्या संरक्षणासाठी इंग्रजा विरोधात लढा देणारे क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांना स्वातंत्र्यपूर्वकाळात अटक करण्यात आली तेव्हा त्यांना भेटण्यासाठी लाखोच्या संख्येने आदिवासी समाज येत असल्याचे पाहून इंग्रज सरकार हतबल झाले. तुमची कोणती मागणी पूर्ण केली तर ही गर्दी थांबेल असा प्रश्न इंग्रजांना बिरसा मुंडा यांना विचारावा लागला असे त्यांनी सांगितले. या स्पर्धेत तेलंगणा विदर्भ व मराठवाड छत्तीसगड मध्यप्रदेश राज्यातील एकूण १६ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेत तलाईगुडा येथील रावणराज ढेमसा मंडळाने ५१ हजाराचे प्रथम बक्षीस पटकावले असून आ. भीमराव केराम यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षीस प्रदान करण्यात आले. ढेमसा स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी आदिवासी सरपंच, उपसरपंच, आदिवासी कर्मचारी, भीमराव केराम मित्रमंडळातील कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# आ. चिखलीकरांच्या नेतृत्वाखाली अनेक पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.११ एप्रिल-**

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे दक्षिण जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे नागणीकर यांच्या पुढाकारातून आज आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली साई सुभाष या संपर्क कार्यालयामध्ये छावा , संभाजी ब्रिगेड आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या पक्ष आणि संघटनेतील असंख्य कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी माजी मंत्री माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत . अनेक राजकीय पक्षातील दिग्गज नेते मंडळी आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येण्याचा ओघ सुरूच आहे. त्यात नांदेड दक्षिणच्या युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर बालाजी शिंदे यांनी आ. चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली आज नांदेड दक्षिण भागातील मुखेड , देगलूर , बिलोली, धर्माबाद , नायगाव , कंधार या तालुक्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना , संभाजी ब्रिगेड , छावा या पक्ष आणि संघटनांमधील अनेक पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश सोहळा घडवून आणला. या पक्षप्रवेश होण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर , माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर , राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब



रावणगावकर , प्रदेश सचिव माधव पावडे , सरजीत सिंग गिल , भास्करराव भिलवंडे , दीपक पावडे , राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम , नेताजी भोसले , प्रा. सुनील नानवटे , पप्पू जाधव, वसंत सुगावे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख अभिजीत नाइनवाड, उपजिल्हाप्रमुख केदार पाटील ढगे , तालुकाप्रमुख मानिक पाटील हिवराळे , जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर पाटील नरवाडे , बिलोली तालुका उपप्रमुख आनंदराव पाटील हिवराळे , तालुका सरचिटणीस लक्ष्मण नांगरे , तालुका समन्वयक पांडू पाटील तोरनेकर , लोहगाव येथील शिवकुमार कोणेरी , आदित्य शेटकर , सुनील मुस्तापुरे , दीपक स्वामी , आनंदवार हिवराळे, सुधाकर लष्करी दीपक स्वामी निखिल बोरीकर सुरज नाईनवार शिवराज नाईनवाड , विशाल कोनेरी , शुभम सोनेरी यांच्यासह नागणी येथील छावाचे तालुका उपाध्यक्ष प्रशांत यशवंतराव शिंदे ,कैलास पाटील शिंदे ,संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दत्ताहरी पाटील शिंदे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हा संघटक सूर्यकांत आगळे , ग्रामपंचायत सदस्य गजानन पाटील गादगे , छावाचे माजी संघटक बालाजी शिंदे , शिवसेना शाखाप्रमुख संभाजी शिंदे , अंकुश गादगे, प्रहार दिव्यांग शेळके तालुका अध्यक्ष युवराज रामा धोत्रे , सुमित धोत्रे , माधव कांबळे , कुंभारगाव येथील युवा सेनेचे जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर नरवाडे , शिवा संघटनेचे तालुका अध्यक्ष बळवंत पाटील गंभीरे , ग्रामपंचायत सदस्य माधव पाटील गंभीरे, विश्वकर्मा संघटनेचे बिलोली तालुका अध्यक्ष मारुती पांचाळ , सेवा सहकारी सोसायटी कुंभारगावचे सदस्य महेश पाटील नरवाडे , युवा सेना शाखाप्रमुख साईनाथ गंभीरे , बिलोली युवा सेना तालुका सरचिटणीस तथा दुगाव येथील तरुण लक्ष्मण नांगरे , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हनुमंत कदम , शिवा संघटनेचे माजी सरचिटणीस पर्वता पाटील जाधव , दुगाव चे तंटामुक्ती अध्यक्ष हैदरसाब शेख , युवासेना बिलोली तालुका संपर्कप्रमुख पांडुरंग हिवराळे ,छावा तोरणा शाखाप्रमुख विजय पाटील नरवाडे , युवा देगलूर तालुका युवासेना प्रमुख संतोष जाधव पाटील , सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन सुमित समोरकर , काठेवाडी ग्रामपंचायत उपसरपंच तथा युवा सेनेचे सर्कल प्रमुख पवन काठेवाडीकर, देगलूर तालुका समन्वयक सुमन देगावकर , युवासेना गटप्रमुख मरखेल आनंद भूतनहिप्पर्गेकर , काठेवाडी चे सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य माधवराव पाटील, शरद पाटील , ग्रामपंचायत सदस्य संजय पाटील निवळे , माणिक पाटील हिवराळे , माजी सरपंच बालाजी नरवाडे , मुखेड तालुक्यातील युवा सेना तालुकाप्रमुख प्रकाश जाधव यांच्यासह नायगाव , बिलोली देगलूर धर्माबाद कंधार या तालुक्यातील अनेक कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

यावेळी प्रास्ताविक राष्ट्रवादी युवक काँग्रेस दक्षिणचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील शिंदे नागणीकर यांनी केले. तरुणांच्या पाठीवर आपण शाबासकीची थाप द्यावी . निश्चितपणे आगामी काळात नांदेड दक्षिण भागात राष्ट्रवादी काँग्रेस हा पहिल्या क्रमांकाचा पक्ष असेल. गाव तिथे शाखा आणि घर तिथे राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता हा संकल्प घेऊन आम्ही काम करणार आहोत. त्यामुळे आपण बळ द्या अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केले . यावेळी माजी खासदार तथा माजी मंत्री भास्करराव पाटील खतगावकर यांचेही समयोचीत भाषण झाले .सूत्रसंचालन नेताजी भोसले यांनी केले.

**येणाऱ्या निवडणुका तरुणांच्या : आ. चिखलीकर**

विधानसभा आणि लोकसभा निवडणूक ह्या नेतेमंडळीसाठी होत्या . त्या निवडणुकांमध्ये आपला नेता विजय झाला पाहिजे यासाठी तरुणाने मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले. आता राष्ट्रवादी काँग्रेस शेवटच्या घटकापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करा. निश्चितपणे येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या तरुणांसाठी असतील असा विश्वास आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी यावेळी व्यक्त केला.

## संक्षिप्त वृत्त



### स्वामी विवेकानंद महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती साजरी

**मुक्रमाबाद**-मुक्रमाबाद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह दि. ८ एप्रिल ते १४ एप्रिल अंतर्गत दिनांक ११ एप्रिल रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.प्रारंभी महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन पत्रकार रज्जाक कुरेशी यांच्या हस्ते करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक इनामदार हे होते व प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार रज्जाक कुरेशी व रामभाऊ खंकरे उपस्थित होते या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. मा.म.गायकवाड यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे सहकार्यक्रम अधिकारी डॉ.आर.बी.मादळे यांनी केले सदर कार्यक्रमासाठी प्रा.बाळबुधे बी.डब्ल्यू., ग्रंथपाल डॉ. विलास पवार, प्रा.ए.व्ही.शिंदे,प्रा.एस.एल.बिरादार, बालाजी सादगिरे, यांच्यासह मोठ्या संख्येने महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते या कार्यक्रमासाठी उपस्थितांचे आभार प्रा.डॉ.आर.बी.बाविस्कर यांनी मानले.

### गीग व प्लॅटफॉर्म वर्कर यांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

**नांदेड**-केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालय व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने विशेष राष्ट्रीय ई-श्रम पोर्टलवर नोंदणी अभियान ७ ते १७ एप्रिलपर्यत राबविण्यात येत आहे. तरी गीग व प्लॅटफॉर्म वर्करसनी १७ एप्रिलपर्यत या नोंदणी शिबिरात सहभाग घेवून ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी किंवा https://register.esharm.gov.in// user/platform worker-registration या संकेतस्थळावर स्वयं नोंदणी करावी, असे भारत सरकारच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाद्वारे कळविण्यात आले आहे.

या नोंदणी अभियानात गीग व प्लॅटफॉर्म वर्करची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्यात येत आहे. या नोंदीवरुन त्यांचे आयुष्यमान कार्ड काढण्यात येणार आहे. ज्याद्वारे त्यांचे ५ लाखांची प्रत्येक कुटूंबासाठी वार्षिक आरोग्य विमा कवच ३१ हजार रुग्णालयामार्फत करण्यात येणार आहे, अशी माहिती बिडी कामगार कल्याण निधी दवाखाना नांदेड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

### सामाजिक कार्यकर्ते बालाजी पंडागळे यांना समाज परिवर्तन हा पुरस्कार जाहीर

**फुलवळ**-राहुल लोहबंदे मित्र मंडळ ता. मुखेड जि. नांदेड यांच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा समाज परिवर्तन पुरस्कार सामाजिक, शैक्षणिक,



समाजातील दुर्लभ घटकासाठी काम करणाऱ्या कंधार तालुक्यातील शिराढोण येथील सामाजिक कार्यकर्ते बालाजीराव रामराव पाटील पांडागळे यांना जाहीर झाला आहे. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह प्रमाणपत्र शाल श्रीफळ व पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

येत्या १४ एप्रिलला मुखेड ता.मुखेड येथे होणाऱ्या क्रांतीसुर्य ज्योतीबाराव फुले व विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवा निमित्त हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. बालाजीराव हे समाजातील दीनदुबळ्या घटकांसाठी गेली तीन शतकापासून या क्षेत्रात कार्यरत आहेत. सामाजिक क्षेत्रामध्ये त्यांनी स्वतःची वेगळीच ओळख निर्माण केली आहे.या त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राहुल लोहबंदे मित्र मित्र मंडळाच्या वतीने त्यांची पुरस्कारासाठी निवड केली आहे.

# मुदखेडमध्ये 'फुलांची' बाजारपेठ शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरणार : प्रताप देशमुख

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.११ एप्रिल-**

मुदखेड तालुक्यात अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात फुल शेती व्यवसाय केला जातो परंतु याकडे मागच्या २५ वर्षांपासून येथील नेतृत्वाने दुर्लक्ष केले असले तरी आता फुल उद्योगाला चालना देण्यासाठी फुलांची प्रशस्त बाजारपेठ उभी राहिल्याने फुल उत्पादक शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी ठरणार असल्याचे मत मुदखेड काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख यांनी व्यक्त केले आहे. यासोबतच फुल व्यावसायिक व शेतकऱ्यांना असोसिएशन कडून विमा उतरविण्यात यावा जेणेकरून त्यांना सुरक्षा कवच निर्माण होईल अशीही भावना देशमुख यांनी यावेळी व्यक्त केली.

मुदखेड तालुक्यात शेतकरी जोड व्यवसाय म्हणून फुलशेती करतात! तालुक्यातील बहुतांशी गावांत मोगरा, शेवंती, जरबेरा, गलांडा, गुलाब, झेंडू, बिजली, काकडा इ. फुलांचे हजारांच्या वर मळे आहेत. परंतु फुलांसाठी लोकल बाजारपेठ उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना दररोज नांदेड, हैद्राबाद, निझामबाद या शहरात हेलपाटे मारावे लागत असत. फुल बाजारपेठ या विषयाकडे माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांनीही फारसे लक्ष घातले नसल्याने फुल शेतीला राजकीय पाठबळ मिळाले नाही अशी शेतकऱ्यांची खंत आहे. परंतु आता मदिना मस्जिदचे अध्यक्ष मोहम्मद युसूफ आणि मोहम्मद मुसा सेठ यांनी फुल बाजारपेठेसाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. बाजारपेठेत एकूण ३३ गाळे तयार करण्यात आले आहेत. प्रत्यक्ष बोली द्वारे फुलांची खरेदी विक्री चालू झाल्याने शेतकऱ्यांनी



आनंद व्यक्त केला आहे. फुल बाजारपेठेचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष रामराव चौधरी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी हाजी मोहियोदीन उर्फ पाशा भाई, गैबू मामु दावलजी, माजी नगराध्यक्ष राजबहादूर कोतावर, सुनील शेटे, मुजीब अन्सारी, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रतापराव देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास गोडसे,मोहम्मद गौस, करीम खानसाब, माधव कदम, लक्ष्मण देवदे, अँड.कमलेश चौदंते, संजय आऊलवार, प्रा. संदीपकुमार देशमुख, गोविंद गोपानपल्ले, मुजीब पठाण, अतिक अहेमद, अब्दुल रज्जाक, मोईन फुलवाले, धम्मदत्ता कांबळे यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी फुल असोसिएशनचे अध्यक्ष शौकत खान पठाण, उपाध्यक्ष अब्दुल अलीम भाई, सचिव शेख सईद शेख महबूब, हाजी इब्राहिम पहेलवान, नफीस भाई, रौफ खान मुस्तफा भाई, सय्यद अमजद, मिर्झा शेख जमील, फुलारी मोईन फुलारी, इसा बेग, अफरोज बागवान, मोहम्मद वाजिद, सुरेश आडे, रवी आडे, सुभाष राठोड यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले. स्वतंत्र फुल बाजारपेठ उभारणीसाठी मोहमद अझहर, मोहमद उमर, इरफान खान यांच्यासह आदींनी महत्वपूर्ण पुढाकार घेतला.

# एटीएम कमिटीच्या वतीने ईद मिलाप कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.११ एप्रिल-**

एटीएम कमिटी नांदेडने दरवर्षीप्रमाणे ईद-उल-फित्रच्या शुभ दिवसवर नांदेड येथील मुन्यार गली येथे भव्य ईद मिलाप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश समाजात बंधुता, राष्ट्रीय एकता आणि सामाजिक सौहार्द वाढवणे हा होता. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्म, समुदाय आणि सामाजिक वर्गातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ईदचा आनंद सर्वांसोबत वाटून घेण्याच्या भावनेने, एक खास पारंपारिक शिर खुर्मा सादर करण्यात आला, ज्यामुळे कार्यक्रम अधिक आनंददायी झाला. यावेळी मुफ्ती अहमद साहिब (मस्जिद कुरेशिया, नांदेडचे इमाम व खतीब), रामराव बोंढारकर पाटील, आनंद बोंढारकर यांचे बंधू दिलीपसिंग ठाकूर, पोलीस निरीक्षक संजय शिंदे (इतवारा), एपीआय चव्हाण साहिब, नांदेडचे पोलीस निरीक्षक संजय शिंदे (इतवारा) यांच्यासह शहरातील प्रमुख धार्मिक, राजकीय, सामाजिक व प्रशासकीय व्यक्ती सहभागी झाल्या होत्या. इतवारा पोलिस ठाण्यात पंढरी पाटील तडके, शिवसेना शिंदे गटाचे दक्षिण शहराध्यक्ष दुर्गेश यादव, सचिन पवार, मोनू सूर्यवंशी, साई पाटील, माजी नगरसेवक सुरेश हटकर, साबेर चाऊस, अब्दुल हफीज, सय्यद शेर अली, मुजीब जहागीरदार, फारूक बदवाल, अब्दुल रहिम अहमद खान, मसूद खान, अकबर खान, आदींसह अनेकजण सहभागी झाले होते. जमात-ए-इस्लामी हिंद नांदेडचे अध्यक्ष अबरार देशमुख आणि नसीरुद्दीन फारुकी, अधिवक्ता तहूर खान, अधिवक्ता जमीर पठाण, मुन्ना खोकेवाले, जावेद भाई जेडी, मखदूम भाई, खुर्शीद भाई, फहीम सेठ, नूर सर, मुश्ताक भाई आणि इतर उल्लेखनीय. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि देशात परस्पर बंधुता, जातीय सलोखा आणि शांतता आणि सुव्यवस्थेचे वातावरण राखण्याची गरज यावर भर दिला.



**कंधार -क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त प्रियदर्शनी मुलींची उच्च माध्यमिक विद्यालय कंधार येथे त्यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना माजी जिल्हा परिषद सदस्या तथा नांदेड जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षा सौ. वर्षाताई संजय भोसीकर, संजय शिक्षण संस्था चे उपाध्यक्ष कृष्णभाऊ भोसीकर, प्राचार्य किरण बडवणे विद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी. छाया-विनोद महाबळे.**

# जिद्द आणि सातत्याच्या बळावर संदेश बोरगावेने डॉक्टर बनून आई-वडीलाचे स्वप्न केले साकार

**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि.११ एप्रिल-**

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील अल्पभूधारक शेतकरी संजय भीमराव बोरगावे यांनी आपल्या संघर्षमय प्रवासातही आपला प्रामाणिकपणा , चिकाटी आणि काबाडकष्ट करण्याची प्रवृत्ती सातत्यपूर्णपणे पार पाडत दैनंदिन जीवनात आपण जे दिवस भोगतोय ते भविष्यात मुलांच्या नशिबी असू नयेत यासाठी रात्रंदिवस काबाडकष्ट केले , १९९५-९६ साली त्यांनी आपलं जन्मगाव फुलवळ सोडून तेंव्हाचे औरंगाबाद तर आताचे छत्रपती संभाजी नगर गाठले. तेथे ७५० रु प्रति महिन्याप्रमाणे खाजगी कंपनीत नोकरी चालू केली.



कालांतराने संजय व संगीता या जोडप्याला दोन अपत्य झाली. त्यात एक मुलगा संदेश तर दुसरी मुलगी ऋतुजा असे दोन अपत्य झाली.

हळूहळू मूल मोठी होऊ लागली तेंव्हा त्यांना चांगलं दर्जेदार शिक्षण मिळावे अशी या आई-वडिलांची धडपड सुरू झाली. मुलांनाही शिक्षणाची गोडी लागली , त्यातच जसजसे मूल मोठी होऊ लागली तसतसे त्यांना आपल्या आई-वडिलांचे काबाडकष्ट आणि आपल्या प्रतीची तळमळ दिसून येऊ लागली. याच सर्व गोष्टींचा विचार करत संदेश नेही जिद्दीच्या जोरावर व सातत्याने प्रयत्न करत आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठीचा जणूकाही चंगच बांधला. आणि इयत्ता १२ वी मध्ये व नीट मध्ये भरघोस गुण मिळवत एमबीबीएस साठी स्वतः ची निवड कशी होईल याकडे लक्ष वेधले.

संदेश बोरगावे चे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण राजा शिवाजी विद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे घेऊन उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी भीमाशंकर पाडळकर महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश घेतला. त्यानंतर एमबीबीएस डॉक्टरकीचे शिक्षण घेण्यासाठी त्याची महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रेसर्च, लातूर निवड झाली आणि प्रवेश ही झाला. बघता-बघता साडेचार-पाच वर्षे कधी गेली कळलेच नाही आणि नुकताच याच संदेश चा डॉक्टरकीचा पदवी दीक्षांत सोहळा मोठ्या थाटामाटात लातूर येथे संपन्न झाला व बोरगावे परिवारातील पहिला डॉक्टर होण्याचा बहुमान त्याच्या नावे नोंद झाला. याचा संदेश सह त्याच्या आई-वडिलांबरोबरच संपूर्ण बोरगावे परिवारात आनंद निर्माण करणारी सुखद घटना डोळ्यादेखत पाहतांना आई-वडिलांचे डोळे आपसूकच आनंदाच्या अश्रूने पान्हावले होते.

या आनंदमय दीक्षांत सोहळ्याचे साक्षीदार झाल्याचा आनंद सर्व परिवाराला गगनात मावेनासा होता. यावेळी स्वतः संदेश चे वडील संजय बोरगावे बोलतांना म्हणाले की आज माझ्या कष्टाचे चीज झाले असून आजपर्यंत मी दिवसरात्र केलेले काबाडकष्ट फळाला आल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तर डॉ. संदेश बोरगावे म्हणाले की आपण आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत आपल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी अहोरात्र मेहनत घेऊन जिद्द आणि सातत्याने प्रयत्न केले तर यश नक्कीच मिळते याचा मला चांगला अनुभव आला असून माझ्या या डॉक्टर पेशाचा गरजू , गोरगरीब जनतेसाठी नक्कीच निस्वार्थीपणाने व योग्य सेवा देण्यासाठी तत्परपणे व प्रामाणिकपणे प्रयत्न नक्कीच करेन अशी प्रतिक्रिया दिली.

# नांदेड जिल्ह्याची पंचायत विकास निर्देशांकात सर्वोत्कृष्ट कामगिरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.११ एप्रिल-**

दिल्ली येथील भारत सरकारच्या पंचायत राज मंत्रालयामार्फत २०२२-२३ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेल्या पंचायत ॲडव्हान्समेंट इंडेक्स (झख) मध्ये नांदेड जिल्ह्याने अभिमानास्पद कामगिरी केली आहे. राज्यभरातील पहिल्या २५ ग्रामपंचायतींच्या यादीमध्ये तब्बल ९ ग्रामपंचायती नांदेड जिल्ह्यातील असून, हिमायतनगर तालुक्यातील जवळगाव ग्रामपंचायतीने ८०.२१ गुणांसह राज्यात अव्वल क्रमांक पटकावला आहे.

ही कामगिरी साध्य करताना पंचायत विकास निर्देशांकासाठी १६ विभागांमार्फत संकलित झालेला प्राथमिक डाटा ग्रामसभेमार्फत प्रमाणित करण्यात आला. त्यानंतर तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर तपासणी होऊन अंतिमतः तो मंत्रालयाकडे पाठवण्यात आला. या संपूर्ण प्रक्रियेत गट अधिकारी, विभागीय नोडल अधिकारी तसेच ग्रामसेवकांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. जिल्ह्यातील यशस्वी ग्रामपंचायतींमध्ये हिमायतनगर तालुक्यातील जवळगाव, पळसपूर, खडकी (बाजार), विरसानी, एकघरी, पारडी (ज) तसेच भोकर तालुक्यातील नारवट तर माहूर तालुक्यातील लांजी व तुलसी यांचा समावेश आहे. यासाठी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांचे नेतृत्व प्रभावी ठरले. सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर मेघनाथ कावली यांनीही या विषयाला चालना दिली आहे.

जिल्हाधिकारी तथा संकलन समितीचे अध्यक्ष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रमाणीकरण समिती सचिव मंजुषा कापसे, नरेगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, प्रशिक्षक तथा सहायक राज्य समन्वयक मधुकर मोरे, जिल्हा परिषद नांदेड येथील अधिकारी सचिन सोनवणे व जगन्नाथ मुंडकर, ग्राम विकास अधिकारी शैलेंद्र वडजकर यांचे योगदानही मोलाचे ठरले आहे.

# खासदारांनी घेतली सलग तीन तास रेल्वेची बैठक बीड-नगर-मुंबई रेल्वे सुरु करण्याचे दिले निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ एप्रिल**

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम या पूर्वीच्या बैठकांमधे निश्चित करुन देण्यात आलेल्या वेळेत होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करत असतानाच कामाची गती मंदावू देऊ नका. बीड ते परळी रेलमार्गासाठी बाधित होत असलेल्या शेतकऱ्यांना भुसंपादनाचा मावेजा देताना काटकसर करु नका. भुसंपादनाची उर्वरित प्रकरणे तातडीने मार्गी लावा. विद्युतीकरणाच्या कामात येत असलेले अडथळ्यांवर मार्ग काढीत असताना रेल्वे क्रॉसिंगची काही कामे अर्धवट असून ती तातडीने पुर्ण करा. रेल्वेमार्गास विद्युत जोडणीच्या कामाला गती द्या, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी केल्या.

दि.११ एप्रील रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ वाजता रेल्वे विभागाच्या बैठकीला सुरूवात झाली. बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मध्य रेल्वेचे उपमुख्य अभियंता लोळगे तसेच पाटोदा, बीड, माजलगाव महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी, भूसंपादन अधिकारी, महावितरण विभागाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी, आहिल्यानगर आणि नांदेड रेल्वेचे मुकुंद नाईक, एम सुरेश, निगम, एस.आर.कुवर, संजय श्रीवास्तव, यादव, एस.के.मंडल, मानसिंग हे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गाला विद्युत जोडणीच्या कामाची सद्यस्थिती, आष्टी येथील स्थानकास विद्युत जोडणी देणेबाबतच्या कामाची सद्यस्थिती तसेच बीड ते वडवणी बीटमधील विद्युतलाईनचे कामाची स्थिती. वडवणी ते सिरसाळा बिट कामाची सद्यस्थिती याबाबत सविस्तर आढावा घेतला. सुकळी, खामगाव व तपोवन या भागातील नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन रेल्वेमार्गामधे प्रस्तावित करायच्या अतिरिक्त उपाययोजना, सिरसाळा ते परळी कामाची सद्यस्थिती. परळी-परभणी डबल लाईन कामामुळे बाधित होत असलेल्या (परळी)आजादनगर येथील नागरिकांवर कसलाही अन्याय होणार नाही याची दक्षता घेऊन सदरील काम तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या.



सुंदरराव सोळंके महाविद्यालयात क्रांतिसूर्य म.ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी म.फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करताना प्राचार्य डॉ. जी. के. सानप,उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, प्रा सुदर्शन स्वामी, प्रा. प्रकाश शिंदे आदी



# आज जवाहर कॉलनी येथे हनुमान जन्मोत्सव सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ एप्रिल**

बीड येथील जवाहर कॉलनी येथेआज १२/४/२५शनिवारी राम भक्त हनुमान जन्मोत्सवसोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे या निमित्त सकाळी ८ते १०या वेळेत ह भ प बबन देव जोशी महाराज श्रीसमर्गकर यांचे सुश्राव्य हरीकिर्तन होणार आहे .

या बरोबरच महाप्रसाद होणार आहे तरी बीड व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे समस्त जवाहर कॉलनी निवासी व हनुमान भक्त यांनी केले आहे.



स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करताना विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा.उमेश जगताप, मुख्याध्यापक श्री. विठ्ठल काळे, अभ्यास पूरक प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर व इतर शिक्षक सहकारी गण

# निराधारांच्या मदतीसाठी प्रशासन कटीबद्ध

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ एप्रिल**

११ एप्रिल रोजी साक्षाळ पिंपरी येथे शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा अंतर्गत संजय गांधी श्रावणबाळ व इंदिरा गांधी योजनेअंतर्गत पत्र लाभार्थी यांचा DBT बाबत कार्यक्रम पार पडला , याप्रसंगी संजय गांधी विभागाचे नायब तहसीलदार प्रशांत जाधवर बोलत होते .

हा कार्यक्रम जिल्हाधिकारी अविनाश पाठक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या आदेशाने व बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे साक्षर पिंपरी येथे पार पडला .

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशांत जाधवर , नायब तहसीलदार यांनी बोलताना सांगितले की गावातील तसेच मंडळ विभाग पारगाव शिरस अंतर्गत येणाऱ्या सर्व गावातील वरील नमूद योजनेचे पात्र लाभार्थी यांनी तात्काळ आपली नोंदणी करून घ्यावी . जेणेकरून आपले मिळणारे मासिक अनुदान आपल्या खात्यामध्ये वर्ग होण्यास सोयीस्कर होईल व त्याबाबत तहसील कार्यालय येथे चकरा मारण्याची आवश्यकता नाही .यावेळी मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ यांनी लाभार्थ्यांशी चर्चा करताना सविस्तर माहिती दिली . यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की डीबीटी म्हणजेच डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर नोंदणी सर्वांना करणे आवश्यक आहे . त्यासाठी लाभार्थ्यांचे आधार कार्ड हे मोबाईल क्रमांकास लिंक असणे अनिवार्य आहे . आज आपण इथेच ते तपासून घेणार आहोत . आधी मोबाईल क्रमांक आधार कार्डशी जोडून घ्यावे लागते , त्यानंतर आपल बँक खात हे आधार कार्डशी लिंक आहे की नाही पाहणार आहोत . आपले आधार कार्ड बँक खात्याशी जोडले आहे का हे तपासणार आहोत . तसे ते जोडलेले नसल्यास बँकेत जाऊन ते लिंक करून घ्यावे लागणार आहे .

वरील बाबी पूर्ण झाल्यास डीबीटीची प्रक्रिया करण्यासाठी सोबत मोबाईल असणे आवश्यक आहे . कारण डीबीटीचा अर्ज भरून घेताना त्यावर मोबाईल क्रमांक सुद्धा टाकावा लागतो . आणि लगेच त्या मोबाईल क्रमांकावर एक ओटीपी म्हणजेच वन टाइम पासवर्ड जातो . तो ओटीपी सांगावा लागतो . तो ओटीपी ऑपरेटरला सांगितल्यास लगेच डीबीटीची प्रक्रिया संपते . एकदा ओटीपी दिला आणि तो ऑपरेटर मार्फत संगणकावर नोंदविण्यात आला म्हणजे डीबीटीची प्रक्रिया संपलेली असते . त्यानंतर शासनाकडून मानधन येण्यास आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या खात्यावर जाण्यास काही कालावधी लागू शकतो . अशावेळी लाभार्थ्यांनी स्वतः तहसील कार्यालयात विनाकारण चकरा न मारता फोनवर विचारणा केली तरी त्यांना तशी माहिती देता येईल . विनाकारण हेलपाटा होणार नाही . डिबीटी साठी येताना लाभार्थ्यांनी सोबत येताना आधार कार्ड , बँक पासबुक , डीबीटी साठीचा अर्ज आणि राशन कार्ड चा ऑनलाईन क्रमांक सोबत आणण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या .

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात १८ तास अभ्यास अभियानाचे आयोजन

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उपक्रम**
**तभा वृत्तसेवा**
**माजलगगाव दि.११ एप्रिल**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात १८ तास अभ्यास अभियान राबविण्यात येत आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जगात उत्सवात साजरी केली जाते.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे देश उभारणीसह सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात मौलिक योगदान आहे. ज्ञानाची प्रतीक म्हणूनही त्यांना ओळखले जाते. विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याची प्रेरणा घेण्यासाठी १८ तास अभ्यासाचे आयोजन सुंदरराव सोळंके महाविद्यालय व क्रांतीसुर्य सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजता सुंदरराव सोळंके महाविद्यालयात करण्यात आले आहे. या १८ तास अभियानाचे उद्घाटन एड. बी.आर. डक यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. के. सानप आहेत. यावेळी पत्रकार उमेश मोगरेकर, पत्रकार उमेश जेथलिया, प्रा. सुदर्शन स्वामी, अशोक मगर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या १८ तास अभियानात जास्तीत जास्त विदयार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन उपप्राचार्य डॉ. एन. के.मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए कव्हळे, उपप्राचार्य प्रा प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे, समन्वयक प्रा संजय बागुल, ग्रंथपाल दत्ता सोळंके यांनी केले आहे.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ एप्रिल**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या अभ्यास पूरक मंडळांतर्गत संगणक शास्त्र विभागाच्या नियोजित कार्यक्रमात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे म्हणाले आपल्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची अनेक ग्रंथ संपदा असून त्याचा प्रत्येकाने वाचनासाठी फायदा करून घ्यावा. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉक्टर लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ उत्तम साळवे , विज्ञान विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुलकर्णी, वाणिज्य विभाग प्रमुख,डॉ रमेश खंडागळे, कला विभाग प्रमुख डॉ.टी.पी सोंडगे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी तथा संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. संजय काळे, प्रा. भार्गव राम चौधरी, डॉक्टर अशोक डोके डॉ.सचिन कंदले, प्रा. राम गव्हाणे, प्रा. अनंत देशपांडे व व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक सर्व स्वयंसेवक विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालयात नवागतांचे स्वागत व रॅलीचे आयोजन करून प्रवेशोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ एप्रिल**



श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालय (केंद्र विभाग) अंबाजोगाई येथे नवीन(छएझ २०२०)राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार इयत्ता पहिली मध्ये प्रवेश पात्र नवागतांचे स्वागत व रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यालयात पहिले पाऊल ठेवलेल्या चिमुकल्यांना शाळेची गोडी लागावी तसेच हा दिवस चिरकाल त्यांच्या स्मरणात रहावा हा या कार्यक्रमा मागील उद्देश होता. नवागतांचे औक्षण करून त्यांना स्मायली चेंडू, पेन्सिल,पुष्प, फुगा, देऊन त्यांचे स्वागत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच नवागतांच्या बोटाला धरून रांगोळी मध्ये ओम गिरवून घेण्यात आले. नवागता समवेत माता पालक व पुरुष पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. विद्यालयात सुंदर असे सुशोभन केले होते.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष शालेय समितीचे अध्यक्ष मा. उन्मेष दादा मातेकर सर, प्रमुख पाहुणे महादेव कावळे सर ( संचालक,श्रीराम वस्तीगृह, अंबाजोगाई ) मुंजाजी नेमाने सर, माता पालक सौ.अश्विनी माने, विशेष उपस्थिती शाळेचे मुख्याध्यापक मा.शिवाजीराव हेंडगेसर, विभाग प्रमुख श्रीधर चौरे सर, कार्यक्रम प्रमुख मंदाकिनी खडके इ. मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंदाकिनी खडके यांनी केले यामध्ये त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. नेमाने सर यांनी शाळेतील शिक्षक विद्यार्थ्यांची आपुलकीने काळजी घेतात असे सांगितले.शिवाजीराव हेंडगे सर यांनी आपल्या संस्कारकेंद्रातील विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व वैशिष्ट्ये सांगत अभ्यासक्रमाबरोबरच छोट्या गोष्टीतून संस्काराची रुजवणूक येथे करत असल्याचे सांगितले. अध्यक्षीय समारोपात मातेकर दादा यांनी विविध अडचणीचा सामना करत आपण शिक्षण घेऊन राष्ट्राच्या उत्थानासाठी,विकासासाठी सदैव तत्पर राहिले पाहिजे असे सांगत ,छोट्या -छोट्या गोष्टीतून देण्याचा संस्कार रुजावा ही संत रामदास स्वामी यांची प्रेरक कथा सांगितली. वैयक्तिक पद्य गायत्री संदिकर यांनी म्हटले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कीर्ती तुपकर यांनी तर आभार सोनवणे सुनिता यांनी मानले. शेवटी पालकांनी आपल्या पाल्यासमवेत सेल्फी काढला यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# समाज मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन मंदिर बांधू-आ.विजयसिंह पंडित

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.११ एप्रिल**

गेवराई शहरातील विरशैव लिंगायत गवळी समाजाला आजवर हक्काचे समाज मंदिर व जागा मिळाली नव्हती,मात्र आ.विजयसिंह पंडित यांच्यामुळे गवळी समाज बांधवांना आता हक्काचे समाज मंदिर व जागा मिळणार आहे.शुक्रवार रोजी गवळी समाज बांधवांनी आ.विजयसिंह पंडित यांची भेट घेत निवेदन दिले.यावेळी समाज बांधवांना उत्तर देताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की,गवळी समाज बांधवांना लवकरच गेवराई शहरात समाज मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन समाजाचे मंदिर उभारण्यात येईल असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले.दरम्यान मागिल अनेक वर्षांपासून हि मागणी गवळी समाज बांधव विविध राज्यकर्त्यांना करत आले आहेत.मात्र आ.विजयसिंह पंडित यांनी गवळी समाजाच्या मंदिरासाठी जागा व मंदिर उभारण्यासाठी आता पुढाकार घेतल्याने शहरातील गवळी समाज बांधवांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.

विरशैव लिंगायत गवळी समाज बांधवांचे गेवराई विधानसभा मतदारसंघात केवळ गेवराई शहरातच दुध व्यवसायामुळे वास्तव्य आहे.शहरात गधळी समाज बांधवांच्या मंदिरासाठी जागा देण्यात येऊन मंदिर उभारण्यात यावे यासाठी मागिल अनेक वर्षांपासून विविध राज्यकर्त्यांना समाज बांधवांनी मागणी केली.मात्र या मागणीकडे राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष करत समाज बांधवांचा निवडणुकीपुरता वापर केला गेला.आ.विजयसिंह पंडित हे आमदार होताच शहरातील गवळी समाजाच्या त्यांच्याकडून अशा पल्लवीत झाल्या आहेत.तसेच माजी आमदार अमरसिंह पंडित यांना देखील पंधरा दिवसांपुर्वी समाज बांधवांनी मागणी करताच त्यांनी या मागणीसाठी सकारात्मक भुमिका घेतली आहे.शुक्रवार रोजी शहरातील गवळी समाज बांधवांनी आ.विजयसिंह पंडित यांची कृष्णाई येथे भेट घेतली.गेवराई शहरात गवळी समाज बांधवांसाठी समाजाच्या मंदिरासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी,तसेच मंदिर बांधण्यासाठी निधी देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.यावेळी आ.विजयसिंह पंडित यांनी गवळी समाज बांधवांच्या मागणीला उत्तर देताना सांगितले की,गेवराई शहरात गवळी समाजाच्या मंदिरासाठी लवकरच जागा उपलब्ध करुन देऊ, तसेच मंदिर बांधण्यासाठी निधी देण्यात येईल असे आश्वासन आ.पंडित यांनी यावेळी दिले.



यावेळी नारायण अवधुत, भागवत परळकर,सुंदरआप्पा दंहिडे,दत्ता हादगुले,बाबा अवधुत, रामेश्वर अवधुत,शंकर हादगुले, बबन परळकर, सोमनाथ नामदेव,शंकर हादगुले,मनोज हादगुले आदिंसह समाज बांधव उपस्थित होते.दरम्यान माजी आमदार अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांनी आता याबाबत लक्ष घातल्याने या मागणीला लवकरच यश येणार असल्याने समाज बांधवांकडून आनंद व्यक्त केला जात आहे.




थोर समाजसुधारक, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा नगर परिषद माजी सभापती मा. नवनाथ आण्णा शिराळे पाटील यांनी भाजपा कार्यालय येथे प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण येथील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी सरपंच सुंदर चव्हाण, राजाभाऊ गवळी, अमोल वडतीले, कपिल सौदा, केशव बडे, अशोक घोलप, नरेश पवार, मच्छिंद्र यादव यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते..